

# तमाशा कला

जैतापकर

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 32९८

REFBK-0025780

संदर्भ निबंध

३२९८
२५७८०
२७।९।८८

३२९८
२५७८०
निबंध २७।९।८८

# तमाशाकला

पां. ल. जैतापकर

REFBK-0025780

Tamasha Kala
By P. L. Jaitapkar

प्रकाशक :
**अरुण गं. कुलकर्णी**
साहित्य सेवा प्रकाशन
पारगावकर निवास
औरंगपुरा, औरंगाबाद.

© **पां. ल. जैतापकर**
शेठ मोतीशहा रोड,
बी. आय. टी. चाळ नं. ३।३३८,
माझगांव, मुंबई नं. ४०० ०१०.

मुद्रक :
**प्रमोद बापट**
स्मिता प्रिंटर्स
नागनाथ पाराजवळ,
१०१९ सदाशिव पेठ, पुणें ३०.

मुखपृष्ठ :
**शीतल शहाणे**

मूल्य : २० रुपये

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्रराज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे.

सर्व दिवंगत तमाशाकलावंतांच्या

स्मृतीस.

# अनुक्रम


महाराष्ट्राच्या लोकप्रिय कला ५

तमाशा कलावंत २२

भेदिक लावण्या व इतर कवने २९

काहीं नामवंत तमाशा कलावंतांचा परिचय ४५

३२९८
२५५८०
विषय २५७३४८

# महाराष्ट्राच्या लोकप्रिय कला

तमाशा ही मुळांत खेड्यापाड्यांतील सामान्य माणसाची करमणूक करणारी एक लोककला. तिला बहिष्कृत समजलया गेलेल्या समाजाने जोपासली. पांढरपेशा वर्गाने तिला हीन ठरवलेली.

या परंपरेत पुढे अनेक थोर कलावंत होऊन गेले. त्यांनी आपले संसार विसरून या कलेला पूर्णपणे वाहून घेतलें आणि तिच्या माध्यमातून खेड्यापाड्यातील आणि शहरांतीलही अफाट जनसमुदायाची भरपूर करमणूक केली, आनंद मिळवून दिला व या कलेच्या प्रगतीलाही हातभार लावला. परंतु भरभराटीचा काळ ओसरल्यावर हे कलावंत विस्मृतीत गेले.

अशा एके काळी गाजलेल्या, पण नंतर पडद्याआड झालेल्या मागील शेसव्वाशे वर्षांच्या काळातील काही थोर, कर्तृत्ववान तमाशा कलावंतांची, जुन्या परंपरेतूनच जी माहिती उपलब्ध झाली, ती येथे देण्याचा प्रयत्न केला आहे.

## महाराष्ट्राच्या लोककला

भारत हा शेतकीप्रधान देश आहे. अन्न पिकविण्यासाठी लोकांना जमिनीत घाम गाळावा लागतो. वर्षाचे बाराही महिने कष्ट करावे लागतात. कष्ट करणाऱ्यांना विरंगुळ्यासाठी करमणुकीची आवश्यकता असतेच. म्हणून लोकांनीच सृष्टीत घडणाऱ्या विविध घडामोडींपासून प्रेरणा घेऊन, आपल्या कल्पनेप्रमाणे करमणुकीचे वेगवेगळे प्रकार निर्माण केले, त्याच या लोककला होत. सुगीच्या किंवा सणावाराच्या दिवसांत, खुशीच्या पोटी, स्फूर्ती आल्यावर, मनातील आनंद व्यक्त करण्यासाठी माणसे एकत्र येतात. कोणीतरी आपला आवाज घुमवितो. माणसे भारावतात. हळूहळू हलूडुलू लागतात. पुढे वेग वाढतो आणि हुंकाराच्या ठेक्यात नाचून ती गोलगोल फिरू लागतात. हेच सांघिक नृत्याचे मूळ होय. मोहक पदन्यास व शरीराची डौलदार हालचाल ही या नाचांची प्रमुख अंगे आहेत.

पुढे यांतील काही लोककला जातिपरत्वे रूढ झाल्या. ब्राह्मण समाजाने धार्मिक आणि पौराणिक ग्रंथांतील काही सुरस आणि चटकदार कथा आपल्या रसाळ भाषेत लोकांना सांगून कीर्तनकला लोकप्रिय केली. इतर पांढरपेशावर्गाने ललिते, दशावतार, दहिकाले, भजने, नाटके यांत रस घेतला. ही स्पृश्य मंडळी. गावकुसाबाहेर फेकल्या गेलेल्या अस्पृश्य लोकांना विटाळाच्या धास्तीने आपल्या संचात सामावून घेणे शक्य नव्हते. परंतु या गावकुसाबाहेरच्या लोकांनाही कलेची आवड होतीच. त्यांनी ढोलकी आणि तुणतुण्यावर गाणी म्हणून आपली करमणूक करून घेण्यास सुरुवात केली. हीच तमाशा या कलेची सुरुवात म्हणावी लागेल !

लोककलांतील उत्स्फूर्त गाणी म्हणताना आणि नृत्ये करीत असताना, त्यामध्ये गती आणि गोडी आणण्यासाठी, ताल आणि सूर यांना पोषक असणारी आणि मधुर ध्वनी निर्माण करणारी सणगे लोकांनीच आपल्या कल्पनेने निसर्गातील निरनिराळ्या वस्तूंपासून तयार केली. लाकडाच्या ओंडक्याला आतून पोखरून त्याच्या दोन्ही तोंडांना चामडे लावले आणि त्याचा ढोल बनविला. बांबूला भोके पाडून त्याचा पावा बनविला. सनईच्या तोंडाला ताडाच्या पातींच्या जिभा लावून त्यातून मंजुळ स्वर काढला. तसेच मातीच्या घागरीला आणखी एक तोंड लावून त्यावर चामडे बसविले आणि तिची घुमटी बनविली. अशा प्रकारची आणखीही कितीतरी वाद्ये तयार केलेली आढळतील. ही वाद्ये त्यांची त्यांनीच वाजविली. तेच त्यांचे गुरू आणि तेच शिष्य. या सर्व वाद्यांनी या कलांच्या आविष्कारामध्ये रंग भरला, जोष आणला आणि बेहोषी निर्माण केली. बेहोषीने माणूस सुखावतो.

## तमाशाकला

महार–मांग आदी ज्ञातींतील मंडळींनी सुरवातीस ढोलकी व तुणतुण्यावर गाणी म्हणून आपली आणि इतरांचीही करमणूक केली. काही काळानंतर, त्यांच्या या गाण्यांच्या प्रकारामध्ये बदल होऊन भेदिक गाण्यांची प्रथा सुरू झाली व त्यातून निर्माण झालेल्या सवाल-जबाबांचे झगडे ऐकणे लोकांना आवडू लागले.

झुंज म्हणजे टक्कर. मग ती बैलांची, रेड्यांची, कोंबड्यांची, मल्लांची किंवा कलावंतांची असो, कोण जिंकला आणि कोण हरला हे पाहण्याची लोकांना उत्सुकता फार ! या प्रवृत्तीमुळे भेदिक लावण्यांतील झगड्यांच्या प्रकाराने, त्यांची करमणूक होऊ लागली. प्रत्येक फडवाला, आपण दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ आहोत, हे दाखविण्याचा प्रयत्न करीत असे. त्याकरिता तो पौराणिक ग्रंथांतील आणि पुराणांतील काहीतरी गूढात्मक असे शोधून काढून, ते लावणीतून प्रश्न म्हणून दुसऱ्यावर टाकी. दुसराही त्यांच्यासारखेच, त्या ग्रंथांतून त्याचे उत्तर शोधून काढून, लावणींतूनच त्याचे उत्तर देई. अशा प्रकारे हे झगडे चालत. त्यात लोकांना काहीतरी

नवीन ऐकायला मिळे. तसेच त्यांच्या ज्ञानातही भर पडे. ते एक प्रकारचे बौद्धिकच होते. म्हणून अशा कार्यक्रमांना श्रोत्यांची गर्दी होत असे.

एक आख्यायिका आहे. शंकर हा तापट देव. शंकर आणि पार्वती यांच्यामध्ये नेहमी झगडे चालत. असाच एकदा शंकर पार्वतीबरोबर झगडा करून रागाने पर्वतावर निघून गेला आणि तेथे त्याने तपश्चर्या सुरू केली. मग पार्वतीला प्रश्न पडला की आता रागावलेल्या शंकराला समजावून आणायचे कसे ! तिने तरुण भिल्लिणीचे रूप धारण केले आणि त्याच्यापुढे जाऊन मोहिनी-नृत्य सुरू केले. नृत्याचा झंकार कानी पडताच शंकराने डोळे उघडले आणि पहातो तर एक सुंदर भिल्लीण त्याच्यापुढे नृत्य करीत आहे. तो तात्काळ तिच्यावर मोहित झाला आणि आपली तपश्चर्या सोडून तिच्यामागे धावला.

शंकर आणि पार्वती यांच्या अशा प्रकारच्या झगडयांचा आधार घेऊन तमाशातील भेदिक लावण्यांमध्ये दोन पक्ष तयार झाले. एक तुरेवाला आणि दुसरा कलगीवाला. शंकराचे उपासक हे तुरेवाले आणि पार्वतीचे उपासक कलगीवाले. शंकर आणि पार्वती यांचा झगडा तेव्हाच संपला; पण तुरेवाले आणि कलगीवाले यांचा झगडा मात्र, भेदिक लावण्यांच्या रूपाने, लोकांच्या करमणुकीसाठी तसाच मागे राहिला.

कोळी आणि प्रभू ज्ञातींच्या लोकांची वस्ती असलेले मुंबई हे पूर्वी एक खेडेच होते. या खेडयाचा विकास होत गेला आणि ते एक सोईस्कर असे बंदर झाले. बंदर झाल्यावर व्यापारउदीम वाढत गेला. गिरण्या-कारखाने निघाले आणि ते एक औद्योगिक शहर बनले. तेव्हा उद्योगधंद्यासाठी लोक खेडयापाडयांतून मुंबईकडे धावू लागले. मुंबईची अधिक वाढ होत गेली. सबंध भारतातून लोक मुंबईला येऊ लागले. सर्व जातिधर्मांचे लोक मुंबईत दिसू लागले. भारतातल्या अनेक भाषा मुंबईत ऐकू येऊ लागल्या. भारतातले लोक पाहायचे असतील व भाषा ऐकायच्या असतील तर मुंबई पाहावी, असे होऊन गेले.

नोकरीधंद्यासाठी खेडयापाडयांतून मुंबईस आलेला माणूस, काही काळाने बदलत गेला. त्याच्या राहणीत आणि आवडी-निवडीत बदल होत गेला. त्याचबरोबर त्याचेमागून त्याच्याच करमणुकीसाठी खेडयापाडयांतून आलेल्या कला व कलावंतांमध्येही बदल होत गेला. खेडयांतील सर्वच कलावंत काही मुंबईचा पल्ला गाठू शकले नाहीत. पण जे आले ते आपल्या कलेच्या जोरावर लोकप्रिय झाले. मुंबई हे अशा कलावंतांचे आणि त्यांच्या कलेचे विद्यापीठच बनले. या विद्यापीठातून बाहेर पडलेले लोक, लोकप्रियता आणि प्रसिद्धी यांच्या शिखराला पोचले.

जे. जे. इस्पितळाच्या पश्चिमेकडील भायखळ्याच्या पुलापर्यंतचा भाग म्हणजे पूर्वी एक प्रशस्त मैदान होते. नागपंचमीच्या सणाचे दिवशी या मैदानावर मोठी जत्रा भरत असे. ती पाहण्यासाठी मुंबईच्या सर्व भागांतून लोक येत. गारुडी लोक आपापल्या टोपल्यांतून साप आणून रस्त्याच्या दोन्ही बाजूंना बसत. जत्रेला आलेली माणसे भक्तिभावाने त्या सापांना दूध पाजीत आणि पैसे टाकीत. यावरूनच या भागाला नागपाडा असे नाव पडले असावे. त्या दिवशी आतल्या मोकळ्या मैदानात भेदिक तमाशेवाल्यांचा मोठा मेळावा भरत असे. हे तमाशेवाले आपल्या घरांतून निघताना चांगले कपडे घालून व खांद्यावर तमाशाचे निशाण घेऊन रस्त्याने ढोलकी-तुणतुण्यावर गाणी म्हणत या ठिकाणी येत आणि जागा मिळेल तेथे थव्यांनी बसून खूप वेळपर्यंत गाणी म्हणत राहात. काही तमासगिरांच्या भेदिक लावण्यांच्या चढाओढीही चालत आणि त्या ऐकायला लोकांची गर्दी होत असे.

भेदिक लावण्यांचा असा बराच काळ गेला आणि मग या प्रकारातही बदल घडून आला. शहरात येऊनही ज्यांच्या पाठीमागे श्रमच लागले आहेत अशा लोकांना, असले हे गूढ प्रश्न आपल्या काय कामाचे, असे वाटल्यास नवल नाही. थकूनभागून आल्यावर त्यांना चार घटका विरंगुळा हवासा वाटे. अशा परिस्थितीत प्रेक्षकांना काय हवे आणि काय नको याचा विचार डोक्यात घेऊन या भेदिक तमाशेवाल्यांनी, आपल्या तमाशामध्ये वेळोवेळी बदल घडविला आणि त्यानुसार तमाशामध्ये रंगदार लावण्या आल्या, चांगले गाणारे आले, चांगला अभिनय करणारे कलावंत आले, स्त्रीसारखे दिसणारे नाचे आले, हुशार सोंगाडे आले, गण आला, गौळण आली, फार्स आला आणि चांगले वगही आले. तमाशा रंगदार, ढंगदार आणि आकर्षक बनला. तमाशाचे कार्यक्रम लोकप्रिय होऊ लागले. तमाशा पाहण्यासाठी गर्दी होऊ लागली आणि त्याचबरोबर आणखीही तमाशाफडांनी आकार घेतला.

**नाच्या**–तमाशामध्ये नाच्या हे महत्त्वाचे पात्र होय. नाच्याशिवाय तमाशाला रंग नाही म्हणून तमासगीर लोक नाच्याची निवड अत्यंत चोखंदळपणे करीत. कोवळ्या वयाच्या देखण्या तरुण मुलांचीच या कामासाठी ते निवड करीत. या मुलांना लहान वयापासून नाचण्याचे, गाण्याचे आणि स्त्रियांसारखे हावभाव करण्याचे शिकविले जाई. त्यांचे अंगचेच केस लांबसडक राखले जात आणि कार्यक्रमाचे वेळी ते हुबेहूब स्त्रियांसारखे दिसावेत अशा तऱ्हेने त्यांना कपड्यांनी आणि दागिन्यांनी सजविले जाई. पूर्वी दिवट्यांच्या किंवा गॅसबत्त्यांच्या उजेडात तमाशे केले जात. या अंधुक उजेडात हे नाचे अगदी स्त्रीसारखेच सुंदर दिसत असत.

**सोंगाड्या–** तमाशामध्ये खेळकर वातावरण निर्माण करण्याकरिता सोंगाड्याची अत्यंत गरज असते. तो आपल्या अंगच्या अभिनयाने आणि हजरजबाबीपणाने लोकांना खुदकन हसायला लावतो. एखाद्याला हसायला लावणे ही गोष्ट सोपी नाही व ती सगळ्यांनाच जमते असेही नाही. तेथे जातिवंत कलावंतच असावा लागतो. सर्कशीतील विदूषक, नाटकातील विनोदी नट, दशावतारातील संकासूर आणि तमाशातील सोंगाड्या यांची जातकुळी एकच. लोकांना पोटभर हसविणे हे त्यांचे काम असे.

**तमाशातील सरदार–** तमाशामध्ये आणखी महत्त्वाचे पात्र म्हणजे सरदाराचे (म्हणजे मुख्य पुरुषपात्राचे) काम करणारा नट हा होय. तो आकर्षक शरीरयष्टीचा, अभिनयकुशल, आणि पहाडी आवाजात गाणारा असा असावा लागतो. या भूमिकेत काम करून लोकप्रियता मिळवून गेलेले अनेक तमासगीर आहेत.

**झीलकरी–** झीलकरी म्हणजे तमाशातील गाण्याची मागून लांबड ओढणारे. ते दोघे असतात. एकाकडे मंजिरी (झांज) व दुसऱ्याकडे तुणतुणे असते. सरदाराने किंवा दुसऱ्या कोणी इतर गाणाराने, गाणे अर्धे म्हणून झाल्यावर सोडून दिले की लगेच या दोघांनी ते त्याच सुरात उचलायचे आणि आपल्या बारीक धारदार आवाजाने वर न्यायचे व मग काही वेळाने ते ठेक्यात खाली आणून स्वरमेळ साधायचा, ही कामगिरी त्यांची. दोघांचाही आवाज अगदी एकच मिळताजुळता असावा लागतो. त्यांच्या या खळखळीत झीलला प्रेक्षकांकडून केव्हा केव्हा उत्स्फूर्त टाळीही मिळते.

**वाद्ये–** ढोलकी आणि हलगी ही तमाशामध्ये रंगत आणणारी दोन अत्यंत स्फूर्तिदायक वाद्ये आहेत. ती आपल्या ठसकेदार पद्धतीने वाजवून प्रेक्षकांना भारून टाकणारे कुशल वादनकार बरेच होऊन गेलेले आहेत. शेकवून कडकडीत केलेली हलगी आणि वरच्या सुरात लावलेली ढोलकी यांची जुगलबंदी सुरवातीला तमाशाचा सबंध परिसर नादमधुर करून टाकते.

**लावणी–** लावणी हे तमाशातील अत्यंत महत्त्वाचे आकर्षण आहे. निरनिराळ्या प्रकारातील तमाशा-संगीतांतील लावणी-संगीत हा प्रकार कोणाही माणसाला उल्हसित करणारा असा आहे. इतर गाण्याप्रमाणे, लावणी हेही एक गाणेच. पण ते नुसतेच गाणे नाही, तर गाण्याबरोबरच त्यात चित्ताकर्षक नृत्य आहे, अनुकूल असे लवचिक शारीरिक हावभाव आहेत, शब्दातील खोच सुचविणारी बतावणी आहे, शृंगार आहे, मनमोकळे हसणे व मुरडणे आहे आणि ढोलकी आणि तुणतुण्याच्या साथीबरोबर प्रेक्षकांना रमविणारे इतर अनेक रंगढंगही आहेत. ही लावणी मराठमोळा पेहेराव केलेल्या, सुंदर व मोहक चेहऱ्याच्या,

तरुण, यौवनसंपन्न नाचणारणीने केल्यासच तिच्यात रंग भरतो. कारण त्या नाचणारणीच्या अंगात तारुण्याचा जोष असतो, नजरेला धार असते आणि तिचे मोहक हसणे प्रेक्षकाला घायाळ करणारे असते.

तमाशामध्ये लावणीशिवाय गण, गौळण, छक्कड वगैरे इतर गाणीही म्हटली जातात आणि तमाशा-संगीतामध्ये विविधता आणली जाते.

**वग–** वग म्हणजे गोष्ट किंवा कथानक. अगदी थेट नाटकासारखे. ते रंगमंचावर प्रत्यक्ष पात्रांकडून घडवून दाखवावयाचे असते. संबंधित पात्रांनीच आपली कल्पकबुद्धी वापरून, प्रसंगाला अनुरूप असे त्यातील आपले संवाद स्वतःच स्वयंस्फूर्तीने बोलावयाचे असतात. वगामध्ये सोंगाड्याच्या पात्रालाही महत्त्व असते. वग चालू असताना कथानक पुढे सरकत असतेच, पण त्या कथानकात खेळकर वातावरण निर्माण करून प्रेक्षकांना सतत हसत ठेवण्याची कामगिरी त्याच्यावर असते. ही कामगिरी जो चांगल्या तऱ्हेने पार पाडतो तोच खरा सोंगाड्या समजला जातो.

## तमाशाकलेचे अंतरंग

ढोलकी-तुणतुण्यावर नुसती गाणी म्हणून करमणूक करून घ्यावयाच्या मूळच्या एका साध्या लोककलेमध्ये बदल होऊन ती सर्व अंगांनी संपन्न झाली आणि काही काळानंतर तिचे रूपांतर भेदिक व रंगीत (तमासगिरांच्या भाषेत रंगतीच्या) तमाशात होऊन ती एक जबरदस्त कला निर्माण झाली, असे आता अतिलोकप्रिय ठरलेल्या तमाशाबद्दल म्हणता येईल.

या रंगीत तमाशाचे कार्यक्रम पुढे पिंपळाच्या पारावर, चावडीसमोर, उघड्या मैदानात, गावच्या जत्रेतून व उत्सवांतून होऊ लागले आणि अशाप्रकारे खेड्या-पाड्यांतील सामान्य जनांना एक उत्तम प्रकारचे करमणुकीचे साधन उपलब्ध झाले.

रंगीत तमाशाच्या कार्यक्रमातून भेदिक लावण्यांच्याही चढाओढी होत आणि या चढाओढीत फड जिंकणाऱ्या तमासगिरांना गावचे पाटील-कुलकर्णी, मानकरी आणि प्रतिष्ठित मंडळी यांच्या उपस्थितीत शेला-पागोटे, कडे वगैरे बक्षिसे देऊन त्यांचा सन्मान करण्यात येई. काही तुल्यबळ फडांमधील चुरशींचा शेवटही अशाच प्रकारे सवाल-जबाबांचे सामने ठेवून पंचाच्या समोर करण्यात येई.

यानंतर पुढे रंगीत तमाशाच सर्वत्र लोकप्रिय ठरला आणि त्याने संपूर्ण महाराष्ट्र गाजवून सोडला.

या क्षेत्रातील जुन्या लोकांपैकी ज्यांची माहिती उपलब्ध झालेली आहे, अशांचा काळ इ. स. १८५० च्या आसपासचाच होता असे दिसते. कारण प्रत्यक्ष घडलेल्या इतिहासाची माहिती या वेळेपासूनच मिळते.

भेदिक लावण्यांचे कवी गुरू भिवबा, कवी बाबाजी वगैरे हे याच काळात होऊन गेलेले आहेत. पण त्यांची कवने आता कोणाला विदित नाहीत. कारण ती कोणी लिहून ठेवलेली दिसत नाहीत. तरीही कवींच्या नावांचा उल्लेख मात्र, त्यांची परंपरा पुढे चालविणाऱ्या त्यांच्या शिष्यांच्या कवनांतून नंतर मोठ्या भक्तिभावाने केलेला आढळतो.

रंगीत तमाशाचा काळ हा साधारणपणे १८६० पासून सुरू झाला व १८८० मध्ये त्याचे स्थान स्थिर झाले अशी माहिती मिळते. याच काळात नगर, नाशिक, पुणे, सातारा, सांगली वगैरे भागांतून आणखी तमाशा कलावंत मुंबईस आले. त्यांनी नवे फड उभे करून ग्रँट रोड प्लेहाऊसच्या भागातील थिएटरातून आपले प्रयोग चालू केले. या सर्व तमासगिरांनी फोरास रोड जंक्शनच्या बाजूलाच असलेली बटाटयाची चाळ हा आपला राहण्याचा अड्डा बनविला. जुन्या काळातील बहुतेक सर्व नामवंत तमासगीर या ठिकाणी राहून गेलेले आहेत. इसवी सन १८९५ ते १९०० या काळात या क्षेत्रामध्ये एक चमत्कार घडून आला. तमाशात नाच्याऐवजी काम करण्याकरिता एका स्त्रीने रंगमंचावर पदार्पण केले आणि लोकांना आश्चर्याचा धक्का दिला. या स्त्रीचे नाव आहे पवळाबाई हिवरगावकर. नृत्यकलेत प्रवीण असलेल्या या गोड गळ्याच्या तरुण आणि देखण्या बाईला रगमंचावर प्रत्यक्ष आपल्या डोळ्यादेखत नृत्य आणि हावभाव करताना पाहून प्रेक्षक अगदी हरखून गेले. त्यामुळे तमाशाची रंगत वाढत गेली आणि प्रयोगांना अफाट गर्दी होऊ लागली. तमाशा अधिकच लोकप्रिय झाला. ही भरभराट साधारणपणे १९२५ पर्यंत चालली. पुढे जुने कलावंत वृद्धत्वाकडे झुकल्यामुळे त्यांचे आकर्षण कमी झाले. त्यांचे जागी त्यांच्या तोडीचे नवे कलावंत त्वरित तयार झाले नाहीत. त्यामुळे तमाशा पुढे मंद होत गेला.

१९३० मध्ये बोलपटयुग सुरू झाले. मूकपटातील पडद्यावरची माणसे बोलू लागली. त्यामुळे लोकांमध्ये मोठे कुतूहल निर्माण झाले. या नाविन्यामुळे लोक सिनेमाकडे वळले आणि त्याचा परिणाम तमाशा बंद पडण्यात झाला व कलावंत बेकार झाले. ही हलाखीची परिस्थिती जवळजवळ पाच वर्षे राहिली. त्यानंतर एक गृहस्थ पुढे आले व त्यांनी ही विस्कटलेली घडी सावरण्याचा प्रयत्न केला. त्या गृहस्थांचे नाव आहे हसनशेठ बांगडीवाले. ते लोकमान्य टिळक रोडवरील मुसाफिरखान्यात राहात असत. त्यांनी बंद पडलेल्या तमाशाफडांच्या मालकांना जवळ करून त्यांना आर्थिक मदतीचा हात दिला आणि त्यांचे बंद पडलेले फड चालू केले. तसेच काही नव्या होतकरू कलावंतांनाही त्यांनी मदत देऊन नवीन फड उभे केले. त्याचबरोबर मुंबईतील निरनिराळ्या कामगार वस्तींच्या आसपास त्यांनी स्वत:च्या

मालकीची तात्पुरती थिएटरे उभारली आणि या नवीन चालू केलेल्या तमाशा-फडांचे रोज बदलते कार्यक्रम या नव्या थिएटरांमधून चालू केले. या फडांना त्यांनी त्यांच्या योग्यतेप्रमाणे मासिक पगार ठरवून, त्यांच्याकडून रोज तीन किंवा चार थिएटरांतून आळीपाळीने एकेक तास कार्यक्रम करून घेतला. या फडांची वेगवेगळ्या थिएटरांतून ने-आण करण्याकरिता एक खास गाडीही ठेवली होती. बॉम्बे थिएटर हे रोज रात्रौ ८ नंतर तमाशासाठी त्यांनी कायमचे आपल्या ताब्यात घेऊन ठेवले आणि तमाशाचे बाबतीतील सर्व हालचाली याच ठिकाणाहून केल्या.

हसनशेठ बांगडीवाले यांनी आपल्या मालकीची मुंबईत तात्पुरती उभारलेली थिएटरे अशी होती–

१) पलटण रोड थिएटर (कारनॅक ब्रीजच्या पायथ्याशी)
२) कृष्ण थिएटर (शेठ मोती शहा रोड, हत्ती बागेसमोर)
३) लोकमान्य थिएटर (केळे बाजार, भायखळा स्टेशनच्या पश्चिमेस)
४) डिलाईल रोड थिएटर (चिंचपोकळी पुलासमोर)
५) वडाचा नाका थिएटर (डिलाईल रोड, दीपक टॉकीजच्या बाजूला)
६) नायगांव थिएटर (अल्पना बझारच्या मागे)
७) वरळी थिएटर (फर्ग्युसन रोड)
८) सैतान चौकी थिएटर (सयानी रोड)

या सर्व थिएटरांतून रोज रात्री आठ वाजल्यापासून एकेक तासाने बदलणारे कार्यक्रम होत. या नव्या जडणघडणीतून जवळजवळ २०–२१ फड हसनशेठ बांगडीवाले यांच्या आश्रयाखाली होते. या सर्वांमधून चांगले गाणारे व अभिनय करणारे नवे गुणी कलावंत पुढे आले. नाच्याचे ऐवजी स्त्रियांचा सर्रास प्रवेश झाला. चांगल्या वर्गाची भर पडली आणि प्रेक्षकांना तमाशा नव्या आकर्षक स्वरूपात पाहावयास मिळू लागला.

काही अतिउत्साही प्रेक्षकांना पुढे नाचणारणीचे गाणे आणि नृत्यच फक्त आवडू लागले. यावरून तमाशामध्ये संगीत बारी हा नवा प्रकार सुरू झाला. संगीत बारी म्हणजे ढोलकी-तुणतुण्याऐवजी पेटी-तबल्यावर, तमाशातील, सिनेमातील व इतर गाणी म्हणून व रंगमंचावर स्त्रियांना नाचवून प्रेक्षकांची करमणूक करणे, हा प्रकार होय. ढोलकीचा तमाशा व संगीत बारी हे दोन्ही प्रकार त्यानंतर या नव्या थिएटरांतून प्रेक्षकांना एकाच ठिकाणी पाहावयास मिळू लागले. अशाप्रकारे तमाशाची पुढील पंधरा वर्षे चांगली भरभराटीची गेली.

पण १९४८ मध्ये पुन्हा एकदा नवे संकट येऊन कोसळले. त्या वेळच्या मुंबई राज्य सरकारनेच तमाशा कलेला अश्लील ठरवून तिच्यावर बंदी घातली. त्यामुळे

तमाशा पूर्णपणे बंद पडला आणि कलावंतांवर उपासमारीची पाळी आली. परंतु या कलेच्या चाहत्यांनी, तमाशा ही अश्लील कला नसून ती महाराष्ट्राची सांस्कृतिक कला असल्याचे सरकारला पटवून दिले आणि बंदी उठविण्यास भाग पाडले. या नंतर पुन्हा तमाशा चालू झाला, पण पूर्वीसारखा जम बसावयास थोडा काळ जावा लागला. याचवेळी हसनशेठ बांगडीवालेही पैगंबरवासी झाले (१९५०) आणि त्यांनी उभारलेली सर्व थिएटरे एकामागून एक बंद पडत गेली. त्यानंतर साकार झालेला तमाशा आता चालू आहे.

## तमाशा सादर करण्याची पद्धत

तमाशा सादर करण्याची एक ठराविक पद्धत आहे त्याच पद्धतीनुसार तो सादर केला जातो. त्यामध्ये एकंदर पाच कलाप्रकार आहेत. गण, गौळण, फार्स, लावणी आणि वग हेच ते पाच प्रकार होत. ते सर्व एकामागून दुसरा, याप्रमाणे कार्यक्रमाच्या वेळी रंगमंचावर करून दाखविले जातात.

तमाशा सुरू करण्याची वेळ झाली की एका बाजूने ढोलकीवाला व दुसऱ्या बाजूने हलगीवाला, असे दोघेही आपापली सणगे वाजवीत रंगमंचावर प्रवेश करतात. ते जुगलबंदी असल्यासारखे, वादनकलेतील विविध प्रकार आणि बारकावे वाजवून आपले कौशल्य प्रकट करतात व सबंध परिसर नादमधुर करून सोडतात. या वाद्यप्रकाराला तोडा असे म्हणतात. तोडा संपला की गणाला सुरुवात होते. तेव्हा, तमाशाला आता सुरुवात झाली आहे, असे समजून श्रोते आत येऊन बसतात

**गण–** गण म्हणजे कार्यक्रम सुरू करण्यापूर्वी करावयाचे गणरायाचे स्तवन. काही पुढे व काही मागे असे पाचसहा कलावंत मिळून सर्व श्रोतृवृंदाला ऐकू जाईल अशा जोरदार आवाजात गण म्हणून गणरायाला वंदन करतात. गण झाल्यावर ते सगळे रंगमंचावरून निघून जातात आणि गौळण चालू होते.

**गौळण** :– गौळणीमध्ये कृष्ण, पेंद्या, दोन किंवा तीन गौळणी आणि मावशी (म्हणजे एक म्हातारी गौळण) अशी पात्रे असतात. तमाशातील प्रमुख गायक नट हा कृष्णाची भूमिका करतो. सोंगाड्याचे काम करणारा कलावंत पेंद्या बनतो, तमाशातील नाचणारीण प्रमुख गौळण आणि दुसरा एखादा सोंगाड्या किंवा इतर कोणीतरी मावशीचे काम करतो. या गौळणीमध्ये नृत्य आहे, गाणे आहे आणि करमणूकप्रधान संवादही आहेत. दह्या-दुधाने भरलेले हांडे डोक्यावर घेऊन गोकुळच्या गौळणी आपला माल मथुरेच्या बाजारात घेऊन जाण्यासाठी निघालेल्या आहेत. त्या नृत्याच्या ठेक्यात गाणे म्हणून प्रवेश करून रंगमंचावर गोलगोल फिरत राहतात. इतक्यात पेंद्या येतो आणि त्यांचा रस्ता अडवितो.

पेंद्या :– थांबा, इथेच थांबा. पुढे पाऊल टाकू नका. रस्ता बंद आहे.

गौळणी :– का? हा तर हमरस्ता आहे. बंद असण्याचे कारण काय?

पेंद्या :– कारण काय? कारण, आमच्या राजाचा हुकूम आहे. पेंद्या त्यांना पुढे जाऊ देत नाही. म्हणून त्या गौळणी मावशीला हाका मारतात. मावशी येते आणि पेंद्याला विचारते, "कोण रे मेल्या तू आमचा रस्ता अडविणारा? चल हट, हो बाजूला" असे म्हणून ती त्याला बाजूला ढकलते आणि गौळणींसह पुढे चालू लागते. गौळणी आपले ऐकत नाहीत असे पाहून पेंद्या कृष्णाला हाका मारतो. लगेच कृष्ण येतो आणि तो गौळणीचा रस्ता अडवितो. इतक्यात मावशी पुढे येते आणि कृष्णाला विचारते.

मावशी :– आगखी कोण रे तू टपलास इथे, आमचा रस्ता अडवायला?

कृष्ण :– मी कोण? मावशे, तू मला ओळखले नाहीस?

मावशी :– नाही.

कृष्ण :– मी कृष्ण, श्रीकृष्ण, कृष्णदेव.

मावशी :– आणखी कुठला नवा देव आलास या पृथ्वीतलावर?

कृष्ण :– मी या पृथ्वीतलावरचा देव नाही. मी स्वर्गातला देव आहे.

मावशी :– मग इथं कशाला आलास, आपला स्वर्ग सोडून?

कृष्ण :– मावशे, असुरांचे निर्दालन करण्यासाठी मी आठवा अवतार घेऊन या पृथ्वीतलावर, गोकुळामध्ये वसुदेव-देवकीच्या पोटी जन्म घेतला आहे. माझी नावे अनेक आहेत. कृष्ण, कृष्णदेव, नंदलाल, देवकीनंदन वगैरे वगैरे. गोकुळचा राजा म्हणतात मला आणि तू मला ओळखत नाहीस? एवढे सगळे ऐकल्यावर गौळणी चकित होतात. त्यांना प्रत्यक्ष देवाची भेट झाल्याबद्दल धन्य वाटते. त्या धडाधड कृष्णाच्या पाया पडतात आणि दोन्ही हात जोडून त्याला विचारणा करतात की, हे देवा, आता आपले काय म्हणणे आहे? कृष्ण सांगतो की, दुसरे आम्हास काही नको. हा जो एवढा माल तुम्ही आमच्या परवानगीशिवाय गोकुळातून बाहेर नेत आहात, त्याबद्दल अशील दान म्हणून आम्हास एक गाणे म्हणून दाखवा आणि आपला माल घेऊन जा. गौळणी मोठ्या आनंदाने गाणे म्हणतात आणि जातात.

इथेच गौळण संपते. ही झाली साधी गौळण, कल्पना येण्यासाठी. परंतु याच प्रसंगावर आधारलेले खुशखुशीत संवाद मावशी व पेंद्या यांच्या तोंडी घालून प्रत्येक

फड आपल्या ढंगाने गौळण सादर करून खूप हशा पिकवितो आणि प्रेक्षकांची करमणूक करतो.

**फार्स** :– फार्स म्हणजे काहीतरी गंमत, करमणूक किंवा विनोद. तात्या आणि बापू हे दोघे मित्र असतात. ते दोघेही थापाडे असतात. बऱ्याच दिवसांनी त्यांची भेट झालेली असते. त्यामुळे ते एकमेकांची विचारपूस करतात. आपल्या बोलण्याच्या ओघात थापा मारून एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करतात आणि आपल्या संवादातून प्रेक्षकांना हसवितात. काही फार्स गमतीदार असतात, तर काही बोध किंवा ज्ञानही देऊन जातात. फार्सनंतर लावणी सुरू होते.

**लावणी** :– लावणी हा तमाशातील एक अत्यंत वैशिष्टचपूर्ण असा भाग आहे. लावण्या अनेक प्रकारच्या आहेत. पण शृंगारावर आधारलेल्या लावण्या प्रेक्षकांच्या विशेष आवडीच्या आहेत. लावणीमध्ये नाचकाम करणारी तरुणी नऊवारी लुगडे नेसून व अंगात तंग चोळी, डोकीत वेणी, नाकात नथ आणि अंगावर अलंकार घालून रंगमंचावर आली की प्रेक्षकांच्या डोळयांसमोर सोज्वळ मराठी ललनेची प्रतिमा उभी राहते. वाद्यांच्या तालावर व पायातील घुंगरांच्या मंजुळ स्वरावर तिचे नृत्य सुरू झाले की प्रेक्षक भारून जातो. सुखावतो.

तमाशातील लावणी-नृत्य हे मुक्त नृत्य आहे. ते तरुण, यौवनसंपन्न व डौलदार शरीरयष्टीच्या नाचणारणीने केल्यासच आकर्षक वाटते. अशी आहे मोहिनी या लावणीची. लावणी झाल्यावर वगाला सुरुवात होते.

**वग** :– लावणी संपल्यावर रंगमंच पूर्णपणे मोकळा झालेला असतो. या मोकळ्या रंगमंचावर पहिल्याप्रथम फड-मालक येतो आणि तमाशा रसिकांनी बहुसंख्येने हजर राहून आपल्या कार्यक्रमाला उदार आश्रय दिल्याबद्दल त्यांचे आभार मानतो व पुढेही त्यांनी असाच आश्रय देऊन आपणास उपकृत करावे असे आवाहन करून निघून जातो. त्यानंतर झीलकार येतात आणि कटाव म्हणतात. कटाव म्हणजे पुढे सादर करण्यात यावयाच्या वगाचे कथानक थोडक्यात सांगणारी एक लहानशी लावणी. कटाव झाला की वगाला सुरुवात होते. वगाचे काम साधारणपणे तासभर चालते.

वग हे पौराणिक, ऐतिहासिक व काल्पनिक कथानकावर आधारलेले असतात. उदाहरणार्थ, हरिश्चंद्र-तारामती, पार्थप्रतिज्ञा, सती सुलोचना हे पौराणिक; उमाजी नाईक, भोसल्यांचा इन्साफ, तानाजी मालुसरे हे ऐतिहासिक, व मोहना बटाव, सावळ्या कुंभार हे काल्पनिक वग आहेत. वग पूर्ण झाला की तमाशा संपतो आणि प्रेक्षक घरोघर निघून जातात.

तमाशातील गाण्यांना ढोलकी, तुणतुणे, हलगी व बारका टाळ यांची साथ असते. ढोलकी, हलगी व बारका टाळ हे तालाकरिता व तुणतुणे सुराकरिता असते. या सर्व वाद्यांची एका सुरात सुरुवात झाली की ऐकणाऱ्याच्या अंगात स्फुरण येते आणि तो तमाशाकडे खेचला जातो.

तमाशामध्ये दोन भाग असतात. एक गाण्याचा व दुसरा संवादाचा. गाण्यामध्ये गण, गौळण, लावणी वगैरे येतात. ही गाणी त्यांच्यांतीलच हुशार तमासगीर, प्रेक्षकांना समजतील अशा साध्यासुध्या भाषेत सहजस्फूर्तीने, यमक जुळवून, तयार करतात आणि गाण्याचा ढंग माहीत असलेला माणूस त्यांना चाली लावून देतो. दुसरा भाग संवादाचा. हे संवाद गौळण, फार्स आणि वगामध्ये असतात ते पात्रांनीच प्रसंगाला अनुरूप असे बोलावयाचे असतात आणि तमाशात रंग भरावयाचा असतो. अशाप्रकारे तमाशा सादर केला जातो.

## भेदिक तमाशा

भेदिक तमाशात भेदिक लावण्यांना फार महत्त्व होते. त्यामध्ये अध्यात्मावर व पोथ्यापुराणातील कूटप्रश्नांवर सवाल–जवाब रचलेले असत. या भेदिक लावण्या तमासगिरांतीलच कविमनाची माणसे आपल्या कल्पनाशक्तीच्या व ऐकल्यासवरलेल्या माहितीच्या आधारावर तयार करीत. ही सर्व मंडळी अशिक्षितच होती. त्यांनी पोथ्यापुराणे वाचलेली नव्हती. पोथ्यापुराणात पारंगत असलेली मंडळी महार–मांगांच्या वस्तीत जाऊन अशा 'ज्ञानावर प्रवचने देत नव्हती. तथापि, या लोकांना ज्ञान देऊ शकणारी, त्यांच्याच समाजामध्ये एक वेगळी अशी संत-महंताची गुरुपरंपरा प्रचलित होती. अगदी थेट धर्मगुरूसारखी. या संतांना आणि महंतांना गावे वाटलेली असत. ते आपल्या कक्षेतील गावांना दोन किंवा तीन वर्षांनी एकदा भेट देत. त्यावेळी गावातील मंडळी त्यांचे स्वागत करून उत्सवासारखा सोहळा साजरा करीत. या सोहळ्यात ते संत आणि महंत लहान लहान मुलांना गुरुमंत्र (कानमंत्र) देऊन त्यांना आपले शिष्य बनवीत. गुरू हा प्रत्येकाला करावाच लागे. गुरूशिवाय ज्ञान कसले, ही धारणा त्या वेळी होती. हा गुरुमंत्र देण्याचा कार्यक्रम संपल्यावर व जेवणे आटोपल्यावर, मोठ्या माणसांसाठी हे संत आणि महंत रात्री एकतारीवर भजने म्हणून आपल्या ऐपतीप्रमाणे, जमलेल्या श्रोत्यांना ज्ञान देण्याचा प्रयत्न करीत. ही भजने तत्त्वज्ञानावर व अध्यात्मावर आधारित असत. हीच या लोकांची तत्त्वज्ञानाची व अध्यात्माची जुनी ओळख म्हणावी लागेल. हे संत आणि महंत कुठल्यातरी एका पंथाला अनुबंधित असत. भक्तीतून जीवनमार्ग दाखविणारे हे पंथ होते. नाथपंथ, कबीरपंथ, रामानंद पंथ, महानुभाव पंथ, हेच ते पंथ होत.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर, भारतीय समाजजीवनात एक फार मोठी क्रांती घडून आली. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी एतद्देशीय शिक्षणाचा मार्ग सर्वांस मोकळा केला. आंधळ्याला दृष्टिलाभ व्हावा, तसेच हे झाले. हे शिक्षण खेड्यापाड्यापर्यंत किंवा सर्वसामान्य माणसापर्यंत तावडतोब जाऊन पोचले नाही तरी मोठमोठ्या शहरांतून, या सामान्य माणसांपैकी काही उत्साही लोक कोणत्या ना कोणत्या मार्गाने लिहावयास व वाचावयास शिकले आणि साहित्याच्या जवळ येऊ शकले.

अस्पृश्य मानले गेलेले लोकही त्यावेळी तेहेतीस कोटी देवांना भक्तिभावे मानणारे व हिंदुधर्माचे नीति-नियम पाळणारेच होते. स्पृश्य लोकांप्रमाणे आपल्याही पदरात पुण्य पडावे म्हणून ते श्रावण महिन्यात हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप वगैरे धार्मिक ग्रंथांची पारायणे करीत. या पारायणांतून एकतारीवर, आपल्या सुरेल आवाजात ओवीबद्ध ग्रंथ वाचन करणारे व त्या ग्रंथाचे रसाळ निरूपण करणारे लोकही त्यांच्यात निर्माण झाले व त्यायोगे त्यांना धार्मिक ग्रंथांचा आणि शास्त्रांचा गाढ परिचय झाला. या ग्रंथांच्या आणि शास्त्रांच्या आधारावर कवी पिराजी बुवा (करंजेकर), कवी बाबाजी वगैरे कवींनी पुष्कळ कवने तयार केली आणि आपल्या शिष्यांकडून तोंडपाठ करून घेऊन आपल्या परंपरा पुढे चालविल्या. कवी पिराजीबुवा (करंजेकर) हे भेदिक तमाशा क्षेत्रातील 'महाकवी' म्हणूनच त्यावेळी ओळखले जात. त्यांचा शिष्यपरिवार मोठा होता. कवी पिराजीबुवा हे तुरा पक्षाचे व कवी बाबाजी हे कलगी पक्षाचे कवी होते.

कलगी व तुरा या दोन पक्षांतील झगडे किंवा सवाल-जबाब हे कवींच्या आणि तमासगिरांच्या ज्ञानाची कसोटी लावण्याचेच प्रकार होते. शिव श्रेष्ठ की शक्ती श्रेष्ठ, झाड अगोदर की बी अगोदर, पाणी आधी की जमीन आधी, ब्रह्मांड कसे निर्माण झाले, आत्मा आणि कुडी यांचे नाते काय, अशा प्रकारचे कूटप्रश्न त्यात असत. त्यांची उत्तरे कोणी दिली, तर ती शास्त्राच्या आधारे पटवून द्यावी लागत.

आत्मा हा निर्गुण व निराकार आहे, आणि शरीर हे नाशवंत आहे. शरीरात शक्ती असल्याखेरीज ते चालणार कसे ? म्हणजे शिव आणि शक्ती ही अद्वैत आहेत, म्हणजे एकच आहेत. ते एकमेकांशिवाय अपुरे आहेत. यावरून शिव श्रेष्ठ की शक्ती श्रेष्ठ हा वादच निर्माण होऊ शकत नाही, असे मानणारेही पुष्कळ होते.

परंतु नेहमी त्याच त्याच गोष्टीच्या विवेचनात सर्वांना सारखे आकर्षण राहणे कठीणच. हे कूटप्रश्न काही लोकांना न सुटणाऱ्या कोड्यासारखे वाटल्यास

नवल नाही. दिवसातून एकदा दोन्ही हात जोडून देवाला नमस्कार केला की श्रमजीवी माणसाला, आपण आपल्या पुढील उद्योगाला मोकळे झालो, असे वाटे. डोक्याला जराही शीण न देता दोन घटका निर्भेळ करमणूक मिळाली तर ती त्याला हवीशी वाटे. याच मनोवृत्तीतून पुढे भेदिक तमाशा बाजूला पडून रंगीत तमाशा लोकप्रिय होत गेला आणि व्यवसायाकडे वळला. परंतु अशाही परिस्थितीत हौशी कलावंतांनी भेदिक तमाशाला चांगलेच उचलून धरले होते. सामान्य माणसाच्या बुद्धीला आकर्षित करील अशा सोप्या भाषेतील भेदिक कवनांनी श्रोत्यांवर पकड धरलेली होती.

महाराष्ट्रातल्या सर्व भागांतून लोक पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी मुंबईत येऊन स्थायिक झाले. त्यांच्यापैकी काहींनी फावल्या वेळेत आपल्या आवडीच्या कलेमध्ये स्वतःस गुंतवून घेऊन आपली व इतरांचीही करमणूक केली. अशा आवडीच्या कलांपैकीच भेदिक तमाशा ही एक कला होती.

मुंबईच्या निरनिराळ्या भागात स्थायिक झालेल्या सामान्य जनांच्या वस्तीच्या आजूबाजूला, मोकळ्या जागेत, भेदिक तमाशाचे अड्डे तयार झाले. त्या ठिकाणी कार्यक्रम होत व स्पर्धाही चालत. असे अड्डे (१) क्रॉफर्ड मार्केट, पलटण रोड, (२) कामाठीपुरा, स्टेबल स्ट्रीट, (३) आग्रीपाडा, खटाव मिलच्या पश्चिमेस, (४) दादासाहेब फाळके रोड, म्यु. चाळीच्या बाजूला, (५) मस्तान टँक मैदान, नागपाडा, (६) आझाद मैदान, बोरीबंदर वगैरे ठिकाणी होते. हे कार्यक्रम पाहावयास व स्पर्धा ऐकावयास कुलाब्यापासून वांद्र्यापर्यंतचे रसिक लोक येत. अशाप्रकारे हा भेदिक तमाशा चालू राहिला होता, पण १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले. या युद्धामुळे या कलेवर फार मोठा परिणाम झाला. रात्री उशिरापर्यंत उघड्यावर चालणारे कार्यक्रम बंदच पडले.

पुढे शिक्षणाचा व विज्ञानाचा प्रसार अधिकाधिक होत गेला. नव्या पिढीत नवविचारांच्या प्रणाली आल्या आणि या बाळबोध वळणाच्या प्रकाराचे लोकांस आकर्षण राहिले नाही. मात्र आता त्यातील मूलभूत तत्त्वांवर वेगळ्या स्वरूपात शोध, बोध आणि संशोधन चालूच राहिलेले आहे.

या क्षेत्रात त्यावेळी कवी पिराजीबुवा, कवी बाबाजी, कवी विठ्ठलबुवा पाणोलीकर व कवी वामनगुरू हे भेदिक लावण्यांचे कवी म्हणून गाजले. त्यांनी भराभर कवने केली आणि त्यांच्या शिष्यांनी ती लोकांपुढे सादर करून लोकप्रिय केली. त्यांपैकी काही कवने पुढे दिली आहेत. त्यावरून या कवींच्या काव्यप्रतिभेची कल्पना येऊ शकेल. तसेच काही तमासगिरांची नावेही दिली आहेत.

अशी आहे भेदिक तमाशाची परंपरा.

# तमाशाकला व समाजजागृती

बहुजनसमाजामध्ये एखादी गोष्ट पटवून द्यावयाचे कामी किंवा त्याच्यामध्ये प्रचार करावयाचे कामी तमाशा हे अत्यंत प्रभावी असे माध्यम आहे. समाजजागृतीच्या कामात तमाशा कलेने बहुमोल कार्य केलेले आहे.

**सत्यशोधकी तमाशे**

गरीब बिचाऱ्या भोळ्या शेतकऱ्याची, जमीनदार व शेठ सावकार लोकांकडून होत असलेली फसवणूक आणि पिळवणूक, त्याचप्रमाणे हिंदुधर्मातील दुष्ट रूढी आणि सामाजिक विषमता, यांतून अस्पृश्य वर्गावर लादलेली गुलामगिरी आणि लाचारी व त्यामुळे त्यांना भोगावे लागणारे त्याचे दुष्परिणाम, याविरुद्ध महात्मा जोतिबा फुले यांनी प्रचंड चळवळ उभारली, मोर्चे काढले आणि सरकारकडे निवेदने सादर करून, त्यांच्यावर होणारा अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला.

महात्मा जोतिबा फुले यांचे हे कार्य, त्यांचे पश्चात केशवराव जेधे, जवळकर आदी अनेक सत्यशोधक चळवळीच्या कार्यकर्त्यांनी नेटाने पुढे चालविले. त्यांनी सत्यशोधकी तमाशाचे फड निर्माण केले आणि करमणुकीबरोबरच समाजजागृतीचे कार्य केले. लोकांच्या भोळेपणाचा व अडाणीपणाचा फायदा कसा उठविला जातो व देवाधर्माच्या नावाखाली त्यांना कसे वागवले जाते हे या सत्यशोधकी तमासगिरांनी आपल्या गाण्यांतून व प्रहसनांतून दाखवून दिले आणि यातून बाहेर पडून आपला उद्धार करून घ्यावयाचा असेल तर शिक्षणाशिवाय दुसरा मार्ग नाही हेही पटवून देण्याचा प्रयत्न केला.

**जलसा पार्ट्या**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातून अस्पृश्यतेचे संपूर्ण उच्चाटन करण्यासाठी व पददलितांना प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी प्रचंड चळवळी उभारल्या. सबंध देश जागा केला. लोकांची अस्मिता जागी केली.

डॉ. बाबासाहेबांनी वेळोवेळी केलेल्या भाषणांतून प्रेरणा घेऊन त्यावेळच्या काही तरुणांनी स्वयंस्फूर्तीने जलसा पार्ट्या स्थापन केल्या आणि आपल्या कार्यक्रमांतून या चळवळीचा प्रचार केला. या मंडळींत लोकप्रिय जलसाकार म्हणून श्री. भीमराव करडक, अडांगळे, एम्. के. कांबळे, रामचंद्र बनसोडे आणि दिनकर भोसले हे त्यावेळी बरेच गाजले. त्यांनी स्फूर्तिगीते गाऊन लोकांत नवचैतन्य निर्माण केले आणि खेड्यापाड्यांतून दौरे काढून बाबासाहेबांचा संदेश घरोघर पोचविण्याचा प्रयत्न केला.

गिरणी-कारखान्यांतून काम करून गरीब कामगार कष्ट उपसतात व त्यांच्या कष्टाचा फायदा भांडवलदार उठवतात. या कामगारांमध्ये जागृती निर्माण करून त्यांना त्यांच्या वाजवी हक्काची जाणीव करून देण्याची कामगिरी, कामगार पुढाऱ्यांबरोबरच शाहीर अमर शेख, शाहीर अण्णाभाऊ साठे व शाहीर गव्हाणकर यांनी आपल्या कलापथकांद्वारे गाण्यांच्या, पोवाड्यांच्या व वगांच्या माध्यमातून पार पाडली व या कामगारांची बळकट संघटना बांधण्यास मदत केली.

या तिन्ही शाहिरांनी एकत्र येऊन 'लाल बावटा' कला पथकाची स्थापना केली व अकलेची गोष्ट, माझी मुंबई, मुंबईचा कामगार, पुढारी पाहिजे, महाराजा ग्रामसिंह, इत्यादी वग या कलापथकातर्फे सादर केले. तसेच, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, गोवा मुक्तिलढा व सामाजिक आणि आर्थिक विषमता यांवर आधारित, शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर गव्हाणकर व शाहीर आत्माराम पाटील यांनी लिहिलेले अनेक पोवाडे, लावण्या व इतर स्फूर्तिदायक गाणी शाहीर अमरशेख व शाहीर गव्हाणकर यांनी गाऊन जनजागृतीच्या कार्याला हातभार लावला. ज्या ज्या वेळेला हे कलापथकवाले, जलसाकार आणि शाहीर प्रचारकार्यासाठी दौरे काढून खेड्यापाड्यामध्ये जात त्यावेळी त्यांचे कार्यक्रम पाहण्यासाठी व ऐकण्यासाठी हजारो लोक उपस्थित होत. पाच-पाच दहा-दहा मैलांवरून ते धाव घेत. एवढ्या अफाट जनसमुदायाला पाहून ही कलावंत मंडळी भारावून जात. अमर शेखसारखा जबरदस्त शाहीर आकाशाकडे हातवारे करून आपल्या गगनभेदी आवाजात त्यांच्या काळजाला हात घाली. शेतकऱ्याला त्याच्याच भाषेत त्याचीच परिस्थिती दर्शविणारे गाणे म्हणून दाखवी.

**पद**

शेत माझें
जमीन माझी
हे आकाश माझें

आणि हे गाणे शेतकऱ्याच्या काळजाला भिडे. त्याला जाग येई. खरंच, ही जमीन माझी आहे. हे शेत माझे आहे. या जमिनीशी माझे नाते आहे. या जमिनीत मी घाम गाळतो. ऊन आणि पाऊस अंगावर घेऊन मी आणि माझी बायको व पोरं या जमिनीत राबतो. शेत पिकवितो. पण ते शेत, न पिकविणारेच खाऊन टाकतात आणि माझी बायको व पोरं तशीच उपाशी पोटी झोपी जातात, याचा विचार होईल काय ? लोकशाहीर आत्माराम पाटील आपल्या गाण्यात म्हणतात,

**पद**

आम्ही जंगलचं राज वनवासी
चांद-सूर्यापासून आम्ही आदिवासी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दि. ६–१२–१९५६ रोजी महापरिनिर्वाण झाले. त्यांना श्रद्धांजली अर्पण करताना शाहीर अण्णाभाऊ साठे आपल्या कवनात म्हणतात :–

जग बदल, घालुनी घाव ।।
सांगुनी गेले, आम्हां भिमराव ।।धृ०।।
गुलामगिरीच्या या चिखलांत ।।
रूतून बसला, का ऐरावत ।।
अंग झाडुनी निघ बाहेरी, घेई बिनीवर धाव ।।१।।
धर्मांधांनी अम्हांस छळलें ।।
जुलूमशहांनी तसेंच पिळलें ।।
दगडानें जणु माणिक गिळलें, चोर जहाले साव ।।२।।
एकजुटीच्या या रथावरती ।।
आरूढ होऊन हो बा पुढती ।।
नव महाराष्ट्रा निर्मुन पुढती, राख भिमाचें नांव ।।३।।

सत्यशोधकी तमाशे, जलसा पाटर्या आणि कलापथके ही सर्व तमाशाचीच रूपे आहेत आणि असा त्यांचा प्रचार आहे.

□ □

# तमाशा कलावंत

इसवी सन १८५० ते १९५० या शंभर वर्षांच्या काळांत तमाशाक्षेत्रामध्ये लहानमोठे पुष्कळ कलावंत होऊन गेलेले आहेत. त्यामध्ये गाणी म्हणून प्रेक्षकांना भारून टाकणारे गवई आहेत, वगांतून चांगल्या भूमिका पार पाडणारे अभिनय-कुशल नट आहेत, आपल्या हरहुन्नरी व हजरजबाबीपणाने प्रेक्षकांना खुदकन हसायला लावणारे सोंगाडे आहेत, साजशृंगार केल्यावर अगदी स्त्रीसारखेच दिसणारे व हावभाव करणारे नाचे आहेत. ढोलकी, हलगी वगैरे सणगे चांगल्या प्रकारे वाजवून गाण्यांना रंग भरणारे व आपल्या वाद्यावरील थापेवर व बोटांच्या टिचकीवर नाचणारणीला खुलविणारे उत्कृष्ट वादक आहेत. तसेच तमाशाला लागणारी, साध्या व सोप्या भाषेतील गोड चालींची कवने तयार करणारे कवीही आहेत.

संपूर्ण महाराष्ट्र व्यापून राहिलेल्या या कलेतील पूर्वी होऊन गेलेल्या अशा कलावंतांपैकी सर्वांचीच नावे आणि माहिती आता उपलब्ध होणे केवळ अशक्य आहे. तथापी अशाही परिस्थितीत ज्यांची नावे, कौतुकाचा विषय म्हणून रसिकांच्या आणि त्यांच्या चाहत्यांच्या मुखांत घोळत राहिली आणि त्यामुळे जी उपलब्ध होऊ शकली, त्यांपैकी काही पुढे देण्याचा प्रयत्न केला आहे.

भेदिक तमाशा व रंगीत तमाशा हे तमाशाकलेचे दोन्ही प्रकार त्यावेळी एकदमच चालू होते. पुढे रंगीत तमाशा व्यवसायाकडे वळला. त्याचे प्रयोग व्यापक स्वरूपात वारंवार होऊ लागल्याने या प्रकारातील कलावंतांना प्रसिद्धी व नाव प्राप्त झाले. त्यांना आर्थिक लाभही चांगला मिळू लागला. तसेच त्यांचे स्थानही वेगळे व कायम ठरले. पण भेदिक तमाशाचें तसे नव्हते. तो हौशी कलावंतांची व श्रोत्यांची, फक्त बैठकीच्या स्वरूपात करमणूक करून देणारी एक कला म्हणूनच शेवटपर्यंत राहिला. त्यामुळे तो भेदिक तमाशा, त्याचे कलावंत व श्रोते हे सर्व मर्यादित स्वरूपातच राहिले. असे असल्यामुळे भेदिक व रंगीत तमाशांतील कलावंतांच्या वेगवेगळ्या नामावळी पुढे देण्यात आल्या आहेत.

(इ. स. १८५० ते १९५० या शंभर वर्षांच्या काळातील)

## नामवंत तमासगीर

१) उमा बाबू सावळजकर
२) नामा धुळवडकर
३) अर्जुन बाबा वाघुलींकर
४) राघू इंदुरीकर
५) नाना कृष्णा मनवेकर
६) हरिबा किवळेकर
७) शिवा संभा कवलापुरकर
८) तात्या सावळजकर
९) कडू सुभाना (सुभानराव कोल्हारकर)
१०) पठ्ठे बापुराव
११) दगडू कोंडिबा साळी, शिरोळीकर
१२) धोंडू दगडू वचपेकर
१३) हरिबा वडगांवकर
१४) खंडू दगडू शिवणेकर
१५) सावळा महागांवकर
१६) तात्या वाल्हेकर
१७) कोंडिबा येनेरीकर
१८) आवजी कृष्णा होलार
१९) कचरू लोनवाडीकर
२०) पांडुरंग कालमवाडीकर
२१) पांडुरंग कुरकुंभकर
२२) हरी तळेगांवकर
२३) केसनंदकर
२४) भाऊ फक्कड
२५) भागू नागू माळी
२६) शिवा तासगांवकर
२७) रामा कुंभार वर्धनगडकर
२८) बाबू कुपवाडकर
२९) बाबुराव पुणेकर
३०) शंकर औसरीकर
३१) सावळा औरंगपूरकर
३२) भाऊ बापू नारायणगांवकर
३३) बाबुराव कवठेकर
३४) आनंदा चांदोलीकर
३५) उमा चांदोलीकर
३६) शंकर ढाकमोलीकर
३७) उरळीकर मास्तर
३८) ईश्वरा रेटरीकर
३९) नायकू कामरीकर
४०) शिवा मेढेकर
४१) रामा नामा लवळेकर
४२) चिमाजी गांजेकर
४३) ठकू पुनावळेकर
४४) दामाजी कोरेगांवकर
४५) दशरथ देवठणकर
४६) दादू इंदुरीकर
४७) बाबू कुरणकर
४८) माधव नगरकर
४९) मनोहर गोंधळी
५०) तुकाराम खेडकर
५१) दत्तोबा तांबे शिरोळीकर
५२) जयवंता सावळजकर
५३) धोंडू कोतुलकर
५४) रसूल पिंजारी
५५) चंद्रकान्त ढवळपुरीकर
५६) धोंडू कोंडू कुसगांवकर
५७) शेकू शिवा घाटनांद्रेकर
५८) गणपत पाटील जगताप पिंपळेकर
५९) शंकर ढालेवाडीकर

## उत्तम नट

तमाशामध्ये सरदाराचे म्हणजे प्रमुख पात्राचे काम करणारा माणूस हा चांगला अभिनय करणारा, आकर्षक शरीरयष्टीचा, प्रेक्षकांची मने जिंकणारा व पहाडी आवाजात गाणारा असावा लागतो. या सरदाराच्या भूमिकेत काम करून लोकप्रियता मिळविलेल्या काही कलावंतांची नावे अशी आहेत.

१) कडू-सुभाना (सुभानराव कोल्हारकर)
२) संभा कवलापुरकर
३) भाऊ फक्कड
४) बाबुराव पुणेकर
५) उरळीकर मास्तर
६) गणपत
७) दशरथ देवठणकर
८) आनंदा चांदोलीकर
९) माधव नगरकर
१०) शंकर शिवणेकर
११) तुकाराम खेडकर
१२) संभा औसरीकर
१३) यादव जोर्वेकर
१४) गुणाजी मास्तर नारायणगांवकर
१५) अण्णा कारवीकर
१६) बाबालाल
१७) विष्णू सांगलीकर
१८) शिवा तासगांवकर
१९) बाबुराव कुपवडेकर
२०) बाबुराव कवठेकर
२१) चंद्रकान्त ढवळपुरीकर

## उत्तम गायक

१) कडू सुभाना
२) भाऊ फक्कड
३) दशरथ देवठणकर
४) भागवत मास्तर वासाळीकर
५) बापू नारायण गांवकर
६) सावळा नारायणगांवकर
७) तात्याबा खांबेकर
८) संभा औसरीकर
९) अहमद इस्लामपुरकर
१०) अर्जुन जोर्वेकर

## उत्तम नाचे

१) गंगाराम कोल्हारकर
२) दशरथ देवठणकर
३) बापू नारायणगांवकर
४) सखाराम अडसरकर
५) लहुजी हिवरगांवकर
६) तुकाराम खेडकर
७) रामचंद्र जोर्वेकर
८) गणपत कळमकर
९) रामा बोटेकर
१०) संभा औसरीकर
११) तुकाराम चांदोलीकर
१२) काशीराम कोलेंकर
१३) शंकर सावळजकर

## उत्तम सोंगाडे

१) दगडू साळी शिरोळीकर
२) हरिभाऊ वडगावकर
३) शंकर औसरीकर
४) नाना मनवेकर
५) सावळा औरंगपुरकर
६) काशीनाथ नारायणगांवकर
७) खंडू खेडकर
८) सटवा चांदोर्लीकर
९) दादू इंदुरीकर
१०) दत्ता महाडिक पुणेकर
११) लहुजी हिवरगांवकर
१२) गेनू औंसरीकर
१३) रामा कुंभार वर्धनगडकर
१४) रामा लवळेकर
१५) अंकलखोपचा थळू
१६) काशीनाथ शेकटकर
१७) सावळा महागांवकर
१८) दत्तोबा साळी शिरोळीकर
१९) देवराम हिवरेकर
२०) शंकर पुणेकर
२१) शंकरभाऊ नारायणगांवकर
२२) आनंदा महुदकर
(लातूर भागात प्रसिद्ध)
२३) जयवंता सावळजकर
२४) जयवंता कुपवाडकर
२५) शामू सावळजकर

## उत्तम ढोलकीवादक

१) कडू सुभाना
२) मुक्ता कोल्हारकर
३) तातोबा वाल्हेकर
४) रेवजीबुवा माघाडे
५) शंकर औसरीकर
६) तायाप्पा
७) संभा कवलापुरकर
८) नामा लवळेकर
९) रामभाऊ मांजरीकर
१०) ईश्वरा गोऱ्हेकर
११) सयदू नायगांवकर
१२) सावित्र्या चांदोलीकर
१३) गणपत यळावीकर
१४) ठकू पुनावळेकर
१५) कुशाबा औसरीकर
१६) बाबुराव पुणेकर
१७) भीमा लोंढे
१८) बाबू कुणकवणकर

## उत्तम हलगीवादक

१) यल्लाप्पा ( तात्या सावळजकर )
२) वमाना ( सावळा महागांवकर )
३) कडू सुभाना
४) अहमद इस्लामपुरकर
५) शंकर वडवीकर (पट्टे बापुराव)
६) आनंदा चांडोलीकर
७) रामाकुंभार वर्धनगडकर
८) नाना मनवेकर
९) घाडगे रहिमतपुरकर
१०) अहमद बेलेकर
११) बनुमिया बेलेकर
१२) सावळा नारायणगांवकर



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

१३) कृष्णा होलार
१४) आवजी होलार
१५) शामू पाचेगांवकर
१६) भिवरा औसरीकर
१७) बाबू कुणकवणकर
१८) ज्ञानदेव काकडे

## रंगीत तमाशा फडातील कवी

रंगीत तमाशा फडांतील कवींचीं नामावळ देण्यापूर्वी या कवींच्या संबंधात थोडे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे, ते असे.

रंगीत तमाशा फडांतील हे कवी, लोक-कवी होते. त्यांनीं लोकांच्या बोलीभाषेतील सोप्या शब्दांत आपली कवने तयार केली. ती कार्यक्रमांतून म्हटली जात असतानाच प्रेक्षकांना त्या कवनांचा अर्थ कळे व त्यांना त्यांतील आनंद लुटता येई. ही कवने फडाचा चालक किंवा फडातीलच दुसरा कोणीतरी गती असलेला माणूस आवश्यकतेप्रमाणे तयार करीत असे. प्रत्येक फड हा आपल्या स्वतःच्याच वैशिष्टयाने व स्पर्धात्मक दृष्टिकोनातून वावरत असल्याने, तो इतर फडांची गाणी म्हणत नसे. ते कमीपणाचे समजले जाई. दुसऱ्याचे शिष्यत्व पत्करल्यासारखे होई. अशा परिस्थितीमुळे, सुरवातीच्या काळात जेवढे रंगीत तमाशाचे फड निर्माण झाले, साधारणपणे तेवढे हे लहानमोठे लोक-कवी होऊन गेलेले आहेत, असे म्हणावयास हरकत नाहीं.

पेशवाईच्या उत्तरकाळात, प्रस्थापित शाहीर कवींनी, शृंगाराचे वर्णन करणाऱ्या व उपमा अलंकाराने युक्त अशा ज्या लावण्या रचल्या, त्या कोणी या तमाशांतून म्हटल्या नाहीत. त्या लावण्या या तमासगिरांच्या व त्यांच्या प्रेक्षकांच्याही डोक्यावरूनच जाणाऱ्या होत्या.

या लोक-कवींनी तयार केलेल्या कवनांचे प्रकार म्हणजे गण, गौळण, छक्कड व लावणी हे होत. या लावण्यांत शृंगार जरूर होता, पण लोक समजत त्या प्रकारची अश्लीलता मात्र नव्हती व ती अपेक्षितही नव्हती. तसे पाहिले तर शृंगार नाही कशात ? सर्व सृष्टीच मुळी शृंगारातून निर्माण झालेली आहे. शृंगाररस हा सर्व रसांचा राजा मानला जातो. शृंगार म्हणजे तारुण्यात पदार्पण केल्यानंतर माणसाच्या मनात निर्माण होणारी ती एक यौवनसुलभ रसरशीत भावना आहे. लावणीतील शृंगाराने मन उल्हसित होऊन उत्साह निर्माण होतो आणि सामान्य माणूस आपला शीण विसरून जाऊन पुढील जीवनाला सामोरा जातो, ही या शृंगाराची किमया आहे.

वास्तविक सर्वच कला माणसाचे रंजन करणाऱ्या आहेत. तमाशाकलाही त्यांपैकीच एक आहे. कलेने विकार जागृत करावयाचे नसतात हे कलावंतांनी व प्रेक्षकांनीही ध्यानात ठेवावयास हवे.

तेव्हा या रंगीत तमाशाकलेच्या लोक-कवींपैकी काही ठळक नावे पुढे दिली आहेत.

## लोक–कवी

१) कडू-सुभाना
२) भाऊ फक्कड
३) लहरी हैदर
४) पठ्ठे बापुराव
५) हरिबा वडगांवकर
६) दगडोबा साळी शिरोळीकर
७) तात्या सावळजकर
८) आबा सावळजकर
९) गुणाजी मास्तर नारायणगांवकर
१०) बाबुराव कुपवडेकर
११ दामाजी कोरेगांवकर
१२) रामा कुंभार वर्धनगडकर
१३) बाबुराव पुणेकर
१४) शिवा तासगांवकर
१५) तुकाराम खेडकर
१६) नामदेव लवळेकर

## मैदिक परंपरेतील तमासगीर

### तुरा पक्ष

१) गुरु भिवबा
२) कवी पिराजीबुवा करंजेकर
३) पांडू आजविलकर
४) दाजी पेंढारकर
५) सखाराम भांबेडकर
६) भाग्या हर्दखळेकर
७) पांडू हर्दखळेकर
८) तुकाराम भांबेडकर
९) कवी विठ्ठलबुवा पाणोलीकर
१०) यशा तिवरेकर
११) तानू गुरव ( हर्दखळे )
१२) गोविंद राघो कोंबुर्लेकर (गुरव)
१३) गोविंद कोळसुमकर
१४) नथूबुवा यळा कामतीकर

### कलगी पक्ष

१) गुरु सिदाजी
२) सदू मारुती
३) गुरु बाबाजी ( कर्नाळा )
४) धाकू पाटणकर
५) झिल्या जैतापकर
६) कवी वामनगुरु
७) गुणाजी तुरळकर
८) भिकाजी गुडेकर
९) पांडू उपळेकर
१०) विश्राम झापडेकर
११) चिमाजी शेर्पेकर
१२) बाब्या साखरपेकर
१३) गुणाजी मुंडेकर
१४) बाळाराम गुरव ( पेंढरी )

१५) दगडू कांबळेकर
१६) शिवा दासगांवकर
१७) दाजी सोलगांवकर
१८) बाबू सावडवकर
१९) धाकटू गवळी
२०) हिऱ्या इंदोटकर
२१) रामचंद्र आरळेकर

१५) गोपीनाथ कानोरकर
१६) बाबू साटविलकर
१७) विष्णू कोळसुमकर
१८) सखाराम कोंडेकर
१९) विश्राम उंबर्डेकर
२०) भागाजी कोर्लेकर
२१) निळू वाकेडकर

□ □

# भेदिक लावण्या व इतर कवने

## गण–निराकारी

(कवी पिराजीबुवा)

गणुराज महाराज, तुम्हाला माझी विनंति ॥
प्रसन्न व्हावें, मला सभेमधी द्यावी ज्ञानमति ॥१॥
किती अवतार झाले, गणुराज नाहीं त्यांची गणती ॥
जग उद्धराया, अवता धरला गणपती ॥२॥
केव्हढा नामाचा प्रताप, नामाचे गुण वर्णू किती ॥
गण नमल्यावाचून, कोणी वाचिना शास्त्र-पोथी ॥३॥
तिन्हीं ताळामधी आधी नाम तुझे, नमावा गणपती ॥
तिन्ही ताळ भरून, उरली जागा नाही रिती ॥४॥
ब्रह्मा, विष्णु, महेश त्रिगुण नव्हती उत्पत्ती ॥
कमळावंती, सावित्री, शंभोला नव्हती पार्वती ॥५॥
त्या आधी असेल, म्हणून नमला गणपती ॥
निर्विकार, निर्गुण, पुढे मग झाल्या सगुणमूर्ति ॥६॥
लवंगर-करंजात कवि पिराजी, हाती घेऊन पोथी ॥
सावळा-नारूची जोडी, करंजगांव असे त्यांची वस्ती ॥७॥

## गण–मुळारंभीचा

(कवी पिराजीबुवा)

गणुराज, गणपती, नमितो महाराजा ॥
तेहेतीस कोटी देव, एकंदर सर्वांचा राजा ॥१॥
त्या पायी प्रथम नमावें, तुजला गणुराजा ॥
चौदा विद्या चौसष्ट कला उभारल्या ध्वजा ॥२॥

अनंत युगाचा, अनंत जगाचा, दुसरा नाहीं राजा ।।
वेद श्रुति मौनविल्या, प्रसंगी पडल्याती पैजा ।।३।।
ॐ जप सडामंत्र, नित्य नमस्कार माझा ।।
सभारंगणी सारथी, प्रसंगीं सर्वांच्या काजा ।।४।।
गण, मळीचा म्हणाल, नव्हे हा पूर्ण विचार करजा ।।
मुळारंभी गण विचारतो, शास्त्रामधी पहा जा ।।५।।
गुरु भिवबा वस्ताद माझे, तो सद्गुरु माझा ।।
काळजगांव ठिकाण त्यांचें फलटणीत पहा जा ।।६।।

२

भले भले कविराय वर्णिता, मूळमाया मूळशक्ति ।।
शक्ति नाम सुमरिता, तुम्हांला प्रसन्न सरस्वती ।।१।।
धन्य तुमच्या विज्ञानाची, तुम्हाला बरी लाभली मति ।।
तुमचे बोल ऐकतां, माझी ध्याई तृप्त होती ।।२।।
पाहतां मुखचंद्र, जणु काय, काशीतीर्थ घडती ।।
कानीं उत्तर ऐकतां, जणु काय रामायणाची पोथी ।।३।।
ज्ञानमंतासारखी शक्ति, तुमच्या बसली जिभेवरती ।।
असें मला भासतें की, दावाल मोक्षपदाची ख्याती ।।४।।
'शिव-शक्ति' म्हणतां बरोबर, दोन्ही मुळापून हायती ।।
तुम्हाकडे काय आहे अशी, एक ग्रंथ-ओवी बोलती ।।५।।
अनंतयुगाची खबर पार्वतीला सर्वच माहीत होती ।।
माहीत होती तर, सांबाला का हो ती पुसती ।।६।।
सर्व ग्रंथाची खबर पार्वती निर्विकारमधी पुसती ।।
असें मला भासतें कीं शक्ति निर्विकारमधी नव्हती ।।७।।
नव्हता ॐकार, एकंकार, त्याची निर्विकारमधी वस्ती ।।
दुयेतकारामधी दुजंगकार, घ्या ग्रंथाची प्रचिती ।।८।।
जर कां म्हणाल एकंकार, सोडा ही नागीश्वळची भ्रांति ।।
दुयेतकारामधी दुजंगकार, मुळामधी धरून दावा दोन हाती ।।९।।
एक रूप म्हणाल दोहीचे, कळेल गुरुची मति ।।
पूज्य, मात्रा, काना नाहीं, दोही कशावरून ओळखती ।।१०।।

निर्विकारमधी ज्योत म्हणतां, अंधारी का वो होती ।।
भिनकारामधी, कोणत्या ठिकाणी, कुठेशी ठरली होती ।।११।।
निर्मिकार भिनकार वस्तु, आलक्ष अविनाश होती ।।
भिनकारामधी दुजंकार, सांगा शक्तिनामाची झडती ।।१२।।
तुमच्या नावाचा प्रताप गेला, कवि दुनियेवरती ।।
भिनकारामधी दुजंगकार दावा, पाहू गुरुची मति ।।१३।।
कवि पिराजी युगती काढिती शास्त्र घेऊन हाती ।।
लवंगर करंजे, गांव गुरुचें, दूर गेली कीर्ति ।।१४।।

## पद—मडक्याचे

(कवी पिराजोबुवा)

अंध अंधकार, धुमधुमकार, अवघा निराकार ।।
निराकारामधी मडकं पाहिलं होतं सुंदर ।।१।।

त्या मडक्यामधी आम्ही पाहिला एक चमत्कार ।।
चंद्र सूर्य फिरू लागले, मडक्यामधी सारे ।।२।।

नवलक्ष तारांगण, महाराज मडक्यामधी फिरे ।।
तेहेतीस कोटी देव भरले, मडक्यामधी सारे ।।३।।

विष्णुकचेरी, ब्रह्माकचेरी, मडक्यामधी सारे ।।
शिवशक्ति मडक्यामधी, भरले गाणार ।।४।।

तेहेतीस कोटी देवांचा राजा, मडक्यामधी फिरे ।।
यमराजा त्यामधी करतो कारभार ।।५।।

तीन ताळ, सप्तिपाताळ, मडक्यामधी सारं ।।
एकवीस स्वर्ग, मडक्यामधी ऐका गाणार ।।६।।

घेऊन डोकीवर पाटी कैकाडीन, मडक्यामधी फिरे ।।
बाहेर निघाया मार्ग मिळेना, गडप अंधार ।।७।।

मडक्याबाहेर कोण राहिला, सांगा चातुर ।।
तीन ताळाचं मडकं घेऊन फिरतो भुईवर ।।८।।

मुळामधी जलमय पहिलं पाणी होतं सारं ।।
तेव्हा शाहिरा, मातीचा नव्हता आधार ।।९।।

मातीवाचून कसं शाहिरा मडकं होईल म्होरं ।।
कोठून आणली प्रथम माती, सांगा चातुर ।।१०।।
कवि पिराजीनं सारं काढिलं वाचून शास्तर ।।
सावळा–नारु म्हणे कवीचं करंजगांव दूर ।।११।।

## पद–जंबूद्वीपाचे

(कवी पिराजीबुवा)

ऐक पंडिता तुला सांगतो शास्त्राची खूण ।।
जंबूद्वीपाची लांबी, रुंदी ऐक लक्ष देऊन ।।१।।
जंबूद्वीपाची नऊ खंडे केली भरत राजानं ।।
नऊ पुत्रांना वाटून दिली, तितकीच मोजून ।।२।।
एक एक खंड नऊ नऊ हजार लक्ष योजन ।।
लांबी-रुंदीचे गणित सांगतो लक्ष ठेव पूर्ण ।।३।।
नऊ खंडाला आधार, मदमेरू ठेवला रोवून ।।
सुवर्णाचा मदमेरु, उंची लक्ष योजन ।।४।।
भूमिमधी खोल बत्तीस लक्ष, उंची सोळा सहस्र योजन ।।
लांबी-रुंदींचा घेरा, कवि तुम्ही घ्यावा ऐकून ।।५।।
भूमीवरती चार बाजुला चार पर्वत ठेवल्याती वजन ।।
त्यांच्या मस्तकी मोठे मोठे चार वृक्ष जाण ।।६।।
आंबा, जांभूळ, पिंपळ चौथा वड घे ऐकून ।।
मेरूच्या मस्तकी, ब्रह्मदेवाची नगरी असे जाण ।।७।।
आतां जरासा प्रश्न विचारतो, ऐका गावन ।।
विराटाच्या सत्रावीचे अमृत किती मोजले मापानं ।।८।।
गुरु पिराजीनं मार्ग दाविला, आत्मप्रचीतीनं ।।
तुकाराम–बाबू म्हणे नागिशा, नको जाऊ भरमानं ।।९।।

२

स्कंद पुराणाची कथा जराशी, ऐकण्यात आली ।।
असेल संचित लोकोत्तर, त्यालाच ती समजली ।।१।।
जळामधी आहे मासा, वस्ती त्याने पाण्यामधी केली ।।
दिवस-रात्रीची नाहीं ओळख, हयात व्यर्थच गेली ।।२।।

बैलाचे पाठीवर गोणी साखरेची, बरीच दूर नेली ।।
गवत खाऊन मेला, साखरेची चव नाही गवसली ।।३।।

तसेच तुम्ही-आम्ही जाऊ, ओळख नाही त्याचीं त्याला आपली ।।
सर्व घटी एक ब्रह्म-गंगा, पण आम्हाला कुठे ती कळली ? ।।४।।

अनंत प्रकारची महा महा पापें गंगेनं नेली ।।
असें कळतें तर, तुम्ही का म्हणतां, गंगा अशुद्ध झाली ।।५।।

गंगा अशुद्ध झाली म्हणतां, धुवाया कुठं नेली ।।
असें भाषण ऐकतां श्रवणीं, माझी शुद्ध हरपली ।।६।।

गंगा अशुद्ध झाली म्हणतां, जिव्हा कशी हलली ।।
कोटी सूर्याची प्रभा, अनंत तीर्थाची माऊली ।।७।।

स्कंद पुराणाची कथा, पंढरी महात्म्यामधी लिहिली ।।
भागीरथी, सरस्वती, गंगेची अशी प्रीत जडली ।।८।।

कुक्कुटऋषि, अपार भक्ति, आकाशवाणी झाली ।।
त्यांनीं तिघीजणींना उपदेश दिला, त्यांची दिव्य ध्याई झाली ।।९।।

पुंडलिकाला उपदेश दिला, तेथुन बुद्धी सुचली ।।
दिव्यदृष्टी आली, मूर्ति देवाची ओळखिली ।।१०।।

धरति मेली, कुठेशी पुरली, कवीनें अशी खूण पुसली ।।
आप, तेज, वायु, पृथ्वीच्या तेजामध्ये विरली ।।११।।

अहो ऊन, कुणाची सून, रात कुणाची नात, पहिली ।।
ऐक शाहिरा, खूण घे ओळखून, कुणी टीका लिहिली ।।१२।।

ऊन विष्णूची सून, रात शंकराची नात, झाली ।।
ब्रह्मकर्तव्य ब्रह्मपुराणी अशी टीका लिहिलीं ।।१३।।

गुरू भिवबा वस्ताद माझे, असे कृपेची सावली ।।
फलटण देशात काळजगांव, दूर कीर्ति गेली ।।१४।।

## पद—तुऱ्याचे

### (कवी पिराजीबुवा)

शाहीर शक्तीचे कवि, तुम्ही चतुर बसलाई ।।
शाही शास्तर, अठरा पुराणांचा भेद समजलाई ।।१।।

परमात्म्याचा अंश तुरेवाला, कवि गाणार हाई ।।
परमात्म्यापुन सारी उदपती, रिता ठाव न्हाई ।।२।।

जळीस्थळी ब्रह्म भरलें तुला कळणार न्हाई ।।
हा मायाजाळाचा पडदा शाहिरा तुला आडवा हाई ।।३।।
रामनाम सुमरिता, जळावर पाषाण तरलाई ।।
लटकी माया, मिथ्या बाजार, पोकळ भरलाई ।।४।।
मायाजाळांत पडला, त्याला अगदीच सुटका न्हाई ।।
रामनाम सुमरिता तरून जा, मायामिथ्या होई ।।५।।
जांभऋषींची कन्या दुयिता मांगीण झाली शापाचे पायी ।।
तिच्या उदरी कलंकी अवतार देवानं धरलाई ।।६।।
देव भावाचा भुकेला, तो सर्व घटीं हाई ।।
जडमुंडाचा उद्धार करून अलग उरलाई ।।७।।
मग कसला व्हावा तुरा नागिशा मला विचारताई ।।
तुरा आणि शिरपेच सांगतो, सूर्यपान हाई ।।८।।
सिद्धांत बोधाचा तुरा सांगतो, लक्षामधी घेई ।।
सर्व नराला तुरा झळकतो, मस्तकाचे ठाई ।।९।।
जसा लावावा तुरा, तशी तुझी कलगी कुठं हाई ।।
बिनभांगाची कलगी, अक्षय दावा कविभाई ।।१०।।
गुरु पिराजीची कृपा, त्यांनी मार्ग दावलाई ।।
सावळा-नारू म्हणे, करंजगांव वाईदेशी हाई ।।११।।

## शिव-गौरीचे लग्न

### (कवी पिराजीबुवा)

गणराज गणपतीचा, तुम्ही प्रश्न बरोबर पुसला ।।
शिव गौरीचें लग्न सांगतो, चित्त दे जाबाला ।।१।।
अवंती नगरी, छिप्रगंगेवर लग्न लागलें, विष्णुगण पुजला ।।
पार्वतीमाता प्रसुधा, दक्षपिता आला ।।२।।
दक्षराजाचा पिता ब्रह्मदेव, कैलासांतून आला ।।
महेश्वरीमाया वरमाये, होती महादेवाला ।।३।।
महादेवाचा पुत्र गणपती आला होता लग्नाला ।।
तेहेतीस कोटी देव आले, कोणी नाही चुकला ।।४।।
पुष्पवृष्टि झाली, स्वर्गामधी मोठा आनंद झाला ।।
तांदूळ अक्षत असंख्य पडली, गणती नाही त्याला ।।५।।

अहो पंडित ज्ञानवंत घेई उत्तर आपल्या प्रश्नाला ।।
काशीखंडामध्ये वाचून पहा जा, मग समजेल तुजला ।।६।।
आता जरासा प्रश्न आठवला पुसतो तुम्हाला ।।
कार्तिक स्वामींचे लग्न लागले, कंच्या जाग्याला ।।७।।
कार्तिक स्वामीची नवरी कंची, नाव तिचे बोला ।।
खोटें नव्हें फाकडा पुरावा, काशीखंडाला ।।८।।
गुरु भिवबा वस्ताद माझे, ज्ञानसागर भरला ।।
काळजगांव ठिकाण त्यांचे, फलटण देशाला ।।९।।

## पद—अनसुट जिन्नस

**(कवी पिराजीबुवा)**

तुमच्या नांवाच्या दुरुनी ऐकल्या गोष्टी ।।
तुमच्या आमच्या नशिबांनीं प्रसंगी आज पडल्या गाठी ।।१।।
आवाज ऐकून आलो मी, तुमच्या चरणस्पर्शासाठी ।।
नका जाऊ रागाला, तुमच्या बाळाची आशा मोठी ।।२।।
मत्स्य अवतार धरला देवांनीं, चार वेदासाठीं ।।
शंकासुराचा प्राण घेतला, वेद आणिले पाटी ।।३।।
विश्वामित्रानें सृष्टि केली, भाषा तिची उलटी ।।
प्रतिसृष्टि निर्माण केली. कीर्ति होण्यासाठी ।।४।।
तसें एकंदर मला भासतें, तुमची गोष्ट खोटी ।।
पुराव्यावीण बोलतां, लागेल ब्रह्महत्या पाठी ।।५।।
तीन ताळ, सप्तिपाताळ झाली म्हणतां उष्टी ।।
चार वेद मौनविले, तयाच्या नाही झाल्या भेटी ।।६।।
दृढ आसन घालून बसावें, पवन ओढायासाठी ।।
दाही दरवाजे बंद केल्यावर मग होतील भेटी ।।७।।
चिन्मयवस्तु, अनसुट जिन्नस दृष्टि पडण्यासाठीं ।।
नेत्र झाकून पहावें, प्रचिती भिनकाराचे पोटी ।।८।।
चिन्मयवस्तुचें उत्तर घ्या, तुम्हीं नका होऊ कष्टि ।।
हीच अनसुट जिन्नस, साजिवंत अविनाश एकटी ।।९।।
आतां जरासा प्रश्न विचारतो, नव्हे गोष्ट खोटी ।।
सदाशिवानें तप आरंभले, कोणत्या तीर्थासाठीं ।।१०।।

भोळा शंकर तपास बसला, महादेव जगजेठी ॥
त्याला कोणत्या तीर्थामधीं प्रथम मिळाली अमृताची वाटी ॥११॥
ज्याला प्रचिती घ्यायची असेल, तो करील आटायेटी ॥
आडमार्गी पाखंड म्हणतील, कशाला या खटपटी ॥१२॥
गुरु भिवबा, वस्ताद माझे, विज्ञानाची पेटी ॥
कवि पिराजी, म्हणे घालावी गुरुचे चरणी मिठी ॥१३॥

## पद–बीजाचे

### (कवी पिराजीबुवा)

भले भले पंडीत, बोलणे करतां गर्वाचें ॥
खूण पुसतां, उत्तर होईना शाहीर शक्तीचे ॥१॥
अस्तुरीपाशी, दूध-अमृत, म्हणता कशाचें ॥
रक्ताचें कां पाण्याचें, कसें झालें शुभ्र रंगाचें ॥२॥
घट आधी का पातळ, कसें मन शांत होईल तुमचें ॥
रविमंथन केल्यावीण, आत्मगुज, कसे कळेल त्याचें ॥३॥
बीज पुरुषाचें, दिलें अस्तुरीला, बीज आहे दुधाचें ॥
कोरें होतें, पण प्रकाश करायला पाणी केलें त्याचें ॥४॥
बीज पुरुषाचें दिलें, घट होतें, पण पाणी केलें त्याचें– ॥
अशावरून, ऐक शाहिरा, बीज आहे दह्याचें ॥५॥
कोरें होते पण पाणी केले, कर्तृत्व देवाचें ॥
विरजण टाकून दही केले, मग प्रतिदुधाचें ॥६॥
मंथन करून नवनीत काढलें, तेंच बीज मुळचें ॥
नव्हें पाखंडमत, बोलणें ऐका शास्त्राचें ॥७॥
प्रसंग पडला म्हणून, बोलणें निघालें गुरुघरचें ॥
हें प्रथम बीज कशाचें, सांगा शाहीर शक्तीचें ॥८॥
एवढी खूण सांगा, शहाणपण यांतच कळेल तुमचें ॥
काय वस्तुचें बीज केलें, कवि नांव सांगा त्याचें ॥९॥
खरड आहे का मोती, शहाणपण पाहूं गुरुघरचें ॥
करत तीर्थ द्वापार कलंकीत, एकच बीज मुळचें ॥१०॥
गुरु भिवबा वस्ताद माझे, विज्ञान-सागराचे ॥
काळजगांव ठिकाण त्यांचें फलटण देशाचे ॥११॥

## भेदिक लावणी

### (कवी–राघू सटवू)

(श्री. बी. एस. ताम्हाणेकर यांच्या सौजन्याने)

अहो गण गायी महाराज, गणाची सांगा मूळमती ।।
आन् पार्वतीच्या लग्नात पहिला कुठला गणपती ।।१।।
डफाला चामडं नव्हतं, कोण वाजविती ।।
त्या वेळेला नाच्या कंचा, खुणा सांग पुरती ।।२।।
तांदूळ अक्षत कितीक पडल्या सांगून द्या संती ।।
राघू सटवूनं गण गायीला, सभा दंग होती ।।३।।

## भेदिक लावणी

### (कवी–गो. हो. रावबा)

(श्री. एस. आर. जाधव यांच्या सौजन्याने)

तो– गोरं स्वरूप पाहून तुझं राधः,
गुलाबी ग गेंदा, पदर घ्यावा जपुनि
तुझा सुकुमार चेहरा
पाहता नेत्र गेले दिपुनी ।।१।।

ती – असं काही बोलता, येड्यावानीं दादा,
दिसता साधे भादा, माझ्या बापावानी
नवखी पोरसवदा, आम्हांसारख्या असत्याल
घरी लेकी बहिणी ।।२।।

तो – लेकी बहिणीच सांगती कशाला,
भगाजीचा टिका, देवाजीनं दिला,
सांगतो ऐक खाली बसुनि,
कलियुगाची उत्पत्ती–
झाली बहीण भावापासुनि ।।३।।

ती – शास्त्राच्या गोष्टी सांगू नका मसी,
नव्ह नार मी तशी, नाहीं माझी खुषी,
मी लखपती चरणी,
तुम्ही दिसतां हो परटावानी
धुता अमंगल धुणी ।।४।।

तो – आम्हीं गडे परीट, शुद्ध सहचरी,
जगाचे डाग काढी, स्वच्छ आम्हापासुनि,
आम्ही नाही धुतल्यावर,
काय नेसशील दुसऱ्यांनीं ।।५।।

ती – गंगा गोदा, वाहे नर्मदा,
समुद्राच्या लाटा या–
स्वच्छतेपासुनि,
तिला पाणी नसल्यावर
कोठून आणशील धुवुनी ? ।।६।।

तो – गंगा, गोदा, नर्मदा, करील तुझी काई,
या मेघराजा शिवाई,
पाणी तिला कोठुनी,
जागोजागी पडतील खांदावे,
जाती साऱ्या आटुनी ।।७।।

ती – आतां म्या व झाली राजी तुम्हांला,
यावें रंगमहालाला, अमावास्येच्या दिवशी
चंद्रउद पाहुनी
मग करूं मनाच्या मौजा, पानविडे खाउनी ।।८।।

तो – अमावास्येला ग चंद्र मुळी नाही,
बीजापासुनि कळी कळी वाढत जाई,
चंद्रामागे चांदणी–
तो कशापाय राहिला लपुनी
सांग मुळापासुनी ।।९।।

ती – बहु झाले गाणार, प्रश्न त्यांच्यावर,
तुऱ्याचे कवीश्वर देत्याल सांगुनी,
गोऱ्हो रावबा,
करतो गायन शास्त्र पाहुनी ।।१०।।

## छक्कड

### (कवी–विठ्ठलबुवा पाणोलीकर)

जडाव कवीची रचना केली, बरेच शाहीर जमाजमी ।।
शांत असावें गंगेसारखे, जशी समुद्राची हमाहमी ।।१।।

भरपूर देतो माप सभेमधी, उनी आधेली नाहीं कमी कमी ।।
जखडबंद पकड झाल्यावर, साक्ष देऊ पुढें आम्हीं आम्हीं ।।२।।

आकड लाऊन पकड खेळता, पण शक्तिमधी तुम्ही कमी कमी ।।
चतुर, चतुराई दावा, मग शाब्बास म्हणू आम्हीं आम्हीं ।।३।।

दमडीची भावना हजारांचा गोंधळ, हटली जन्माची समासमी ।।
अटकून पडाल, दातखड फुटल, व्यर्थच जाईल धुमाधुमी ।।४।।

पतंग दिव्याला पाहून तडफडे, पाहतो म्हणे याची खुमाखुमी ।।
व्यर्थ बिचारा मुकला प्राणाला, दिव्याचें तेज नाहीं झाले कमीकमी ।।५।।

मुंगी म्हणे, घालीन पालथा धारागिरी, कशाला याची हमाहमी ।।
कसा उचलेल तिच्या बापाला, तो काय वजनांत कमी कमी ।।६।।

माशी म्हणे, मुखी साठवीन, सप्तसमुद्र तमातमी ।।
कवि विठ्ठल म्हणे याच रीतींनें झाली कैकांची गमागमी ।।७।।

### २

अहो आतमज्ञानाच्या गोष्टी चालल्या, बहिरा प्रेमानं ऐकेल का ।।
चित्ररेख्यानें चित्र काढिलें, आंधळा तसबीर पाहील का ।।१।।

कडू लिंबाला साखर घाला, गोड फळें त्याला येतील का ।।
नागिणीला दूध पाजिलें, डसायाची ती राहील का ।।२।।

गाढवाला उत्तम सजवा, अश्वापरितो दिसल का ।।
घरोघर फिरणारी मांजर, एका ठिकाणीं बसल का ।।३।।

नाक नकटें, रूप वकटें, तिच्या नाकांत नथणी शोभल का ।।
ओठ वाकडे, दात पेचडे, तिचा प्रेमांत मुका कुणी घेईल का ।।४।।

कितीही शिकवून घुबड आणलं तरी राघुची बोली बोलल का ।।
वटवाघुळाला पिंजऱ्यांत ठेवलें तरी उफराटें व्हयाचें राहील का ।।५।।

हटाचे कवि थाटानें बोलतां, कटाचें अक्षर येईल का ।।
कवि विठ्ठल म्हणे पिसाळलेल्या कुत्रीला कुणी उगाच भिऊन जाईल का ।।६।।

## धोबीण

(श्री. चिमाजी शेर्पेकर यांच्या सौजन्याने)

अहंकारांतून आली धोबीण, हाती घेऊन धुणं ॥
आधी अंधकार धुमधुमकार, तिनें धुविलं धुणं ॥१॥
घेऊन हातामधी धुणं, पाताळी शिरली जाऊन ॥
पाताळीचा शेष धुविला, कर्ता भगवान ॥२॥
अहंकार, ओंकार, शून्याकार तीन देव आले धुवून ॥
निर्विकार, निर्गुण धुविला, उरले नाही कोण ॥३॥
ब्रह्मा, विष्णु, महेश धुविले, शंभो त्रिनयन ॥
मोठे मोठे दैत्य धुविले, करूनशानी धुणं ॥४॥
पाणी, पवन, अग्नि, वायु धुविलं धुणं ॥
आकाश, पृथ्वी, तिनें धुविले चंद्र–सूर्य दोन ॥५॥
नवलक्ष तारांगण, धुविला मेरू मंडण ॥
तेहेतीस कोटी देव धुविले, इंद्रपुरी जाण ॥६॥
शाही शास्त्रें, अठरा पुराणें आली धुवून ॥
कृता, वृद्धा, द्वापार, कलंकी, तिनें धुविले धुणं ॥७॥
पाहूनशानी धोबीणीला, अग्नि आला क्रोधानं ॥
तेव्हा धुविलं धुणं, अग्नि जातो पळून ॥८॥
गेली अंगावर चालून अग्निच्या हाती घेऊन धुणं ॥
गेला अग्नि जिरून, राख मग टाकली पळवून ॥९॥
अलक्ष, अगोचर, चराचर, सारं धुविलं धुणं ॥
अचल, निचल, तिने धुविले, उरले नाही कोण ॥१०॥
गुरुराज महाराज, हरिबा झाले प्रसन्न ॥
हरिदासा म्हणे चिमाजी, आली धोबीण ॥११॥

## भेदिक लावणी

(श्री. चिमाजी शेर्पेकर यांच्या सौजन्याने)

हरदास वळीचे कवि, तुम्ही करता गर्वाचें भाषण ॥
तर्कमताचे व्यर्थ बोलणें, यात कळेल शहाणपण ॥१॥
लबाड बोलणें, नरक वासना पूर्वजा लावून ॥
खरें असेल त्याला खोटें जडवितां, कसें देता पटवून ॥२॥

प्रथमचक्र गुदस्थान, कवि घ्यावें ऐकून ।।
तेथे देव गणपती, ऋद्धि-सिद्धि शक्तीचे आसन ।।३।।

चार मातृकाचा जप होतो तेथे कवि घ्यावें ऐकून ।।
त्याच्यावरती चार अंगुले ब्रह्म लिंगस्थान ।।४।।

सर्व दृष्टीने चक्र सहा मातृका बसल्या जप लावून ।।
तेथे ब्रह्मदेव नांदतो, सावित्री शक्ती, बसली जोडयानं ।।५।।

त्याच्यावरती आठ अंगुळी, ते एक नाभिस्थान ।।
तेथे विष्णुदेव नांदतो, लक्ष्मी शक्ती, बसली जोडयानं ।।६।।

तेथे आठ मातृकांचा जप होतो, कवि घ्यावें ऐकून ।।
त्या शंकानाला आवाज येतो, उसळली कमळण ।।७।।

मनपूर चक्र उरुस्थानी, कवि घ्यावें ऐकून ।।
महादेव-पार्वती तेथें जोडयानं बसली, पटवून घ्यावी खूण ।।८।।

बारा मातृकांचा तेथें जप होतो, कवि घ्यावें ऐकून ।।
अनंत कोटी लिंगस्थानं बसली जप लावून ।।९।।

विशुदळ चक्र कंठस्थळी पहा लक्ष देऊन ।।
तेथें अठरा आहेत देवदैवतें ओळखा अवघ्याची खूण ।।१०।।

तेथें सोळा मातृकांचा जप होतो, पहा शास्त्र शोधून ।।
सतरावीचें जीवन पाजितां योगी गेले अमर होऊन ।।११।।

विज्ञानचक्र नेत्रस्थळीं पहा लक्ष लाऊन ।।
तेथें ॐ देव नांदतो, सोंग शक्तीचें आसन ।।१२।।

सडूदळ चक्र, आठवी पायरी, शास्त्री भाषण ।।
कोटी सूर्याची प्रभा, बिदूळ तेथें मसुऱ्याप्रमाणं ।।१३।।

शंक धुवा, अकरावी खिडकी, पहा शास्त्र शोधून ।।
ब्रह्म इंद्रातून बाहेर पडला पहा लक्ष लावून ।।१४।।

अवघड चक्र नववी पायरी धुमकाराची खूण ।।
अलक्ष अगोचर अलक्ष पूजा झाली संपूर्ण ।।१५।।

दसवी अंगुळी, पवन खेळतो, निर्विकार निर्गुण ।।
अनंत युगं, बसला वायु, तंतूचें आसन ।।१६।।

आतां थोडासा प्रश्न विचारतो, कवि तुम्ही सुज्ञान ।।
दसवी अंगुळी भरून उरला, सांगा किती वजन ।।१७।।

गुरुराज महाराज आनंदराव विज्ञानाची खाण ।।
कवीश्वर कवन करतो, नित ध्याई शोधून ।।१८।।

## मढ्याची लावणी

**(श्री. चिमाजी शेर्पेकर यांच्या सौजन्याने)**

लहानथोराची, सभा पंडितांची, अभंड जमला फड ।।
मी अज्ञान पामर कर जोडुनी उभा तुमच्या पुढं ।।१।।

लई दिवसांचं, जुनाट मढं, प्रश्न मोठा अवघड ।।
जिथें जावें तिथें पहावें, मढंच धावतं पुढं ।।२।।

शास्त्र आधारी प्रश्न असला तर पदरी घ्या रोकडं ।।
खरें असून खोटें म्हणाल तर पूर्वज नरकी पडं ।।३।।

चतुर सीमेमधी मांड असतो, तेव स्मशान गावापुढं ।।
त्या स्मशानाला बारा महिने अर्ध असतं मढं ।।४।।

त्या मढ्याचा इतिहास सांगतो, ऐकून घ्यावा पुढं ।।
दर वर्षाला येत्या तिथिला, मढ्याला भेटतं मढं ।।५।।

ओम् दैत्याची कन्या धुंडा, तप केलें तिने अवघड ।।
गावाबाहेर मरण यावें, वर मागी शंकराकडे ।।६।।

धुंडा माराया, गांव जमला, वेढा दिला त्यांनीं चहुकडे ।।
पहिला दगड महाराचा लागला, खाली पाडलं मढं ।।७।।

फाल्गुन महिना, दिवस पौर्णिमा, रतिचळी पडलं मढं ।।
महारानें अग्नि लावला, धुंडाची होळी झाली धडधड ।।८।।

त्याच नांवाची होळी, मानव तिथें घालितो पुढं ।।
महिना फाल्गुन, दिवस पौर्णिमा, पाडती आंब्याचें झाड ।।९।।

त्या होळीचें मढें घेऊन जातां स्मशानमांडाकडे ।।
निर्जीव ढोल वाजू लागला, बोंब मारी पुढं ।।१०।।

आतां थोडासा प्रश्न विचारतो, कवि तुम्हीं दिसतां जाडजूड ।।
या मढ्याचें बारा महिने, सुतक असतं कोणाकडे ।।११।।

गुरुराज महाराज, हरिबाचा आवाज घुमतो चहुकडं ।।
चिमाजी देऊ कवन करतो, करी अक्षरांची जोड ।।१२।।

# देवांची वंशावळ

(श्री. चिमाजी शेर्वेकर यांच्या सौजन्याने)

पार्वती म्हणे शंकरा, चराचर अवतार तुमचा ॥
ब्रह्मा, विष्णु, महेश, ठाव नाहीं तुमच्या करणीचा ॥१॥
तेहेतीस कोटी देव, एकंदर जप करिती तुमचा ॥
तिन्ही ताळामधी पार नाहीं, तुमच्या नामाचा ॥२॥
तुम्हीच करतां नामस्मरण, देव कोण तुमचा ॥
सांगा त्याचें नांव, वडील देव कोण आहे मुळचा ॥३॥
शंकर म्हणे पार्वतीला, देव मीच, कर्ता जगाचा ॥
माझ्यापासून जन्म झाला, अवघ्या देवांचा ॥४॥
निर्विकार, निर्गुण, अनाम आरोप होय मुळचा ॥
त्याचें करतो ध्यान, तेथेच ठाव आमचा ॥५॥
देवा तुम्हीच म्हणतां, श्रीराम हा क्षीरसागराचा ॥
त्याचें करता ध्यान, सदोदित जप रामनामाचा ॥६॥
निर्विकार, निर्गुण, श्रीराम, परब्रह्म मुळचा ॥
आदिमाया लक्ष्मी, अवतार घेई सीतेचा ॥७॥
तुम्ही म्हणता सीता घेऊन गेला, रावण लंकेचा ॥
श्रीराम झाले भयभीत, लक्ष्मण सेवक रामाचा ॥८॥
सीता, सीता, म्हणोनी राम आधार घेई पाषाणाचा ॥
पार्वती म्हणे शंकरा, मी फसविते रामाला, वर असावा तुमचा ॥९॥
पार्वतीमाता रूप बदलून, उभी ठाकली, समोर रामाच्या ॥
धारण करून अवतार, साक्षांत सीतामाईचा ॥१०॥
पार्वतीला पाहून लक्ष्मण हात धरी श्रीरामाचा ॥
ती बघ, सीता आमची, बोले बंधू रामाचा ॥११॥
श्रीरामानें नेत्र उघडुनी, अवतार पाहिला गिरजेचा ॥
कां आलीस आदिमाया पार्वती, कर्ता जगाचा ॥१२॥
निर्विकार राम, चराचर अवतार होय मुळचा ॥
भाव कळेना, ठाव नाहीं, त्याच्या करणीचा ॥१३॥
आतां थोडासा प्रश्न विचारतो, जबाब द्या याचा ॥
किती रामबुंद पडली, तुम्ही हिसाब द्या याचा ॥१४॥

गुरुराज महाराज, आनंदराव सागर बुद्धीचा ।।
हरिभाऊ वस्ताद आमचे, सेवक संतांचा ।।१५।।

## लावणी : पति-पत्नीची

**(कवी श्री. चिमाजी शेपेंकर)**

चला, प्रिया महाली शेज मी केली सजणा ।।
मुख पाहिल्याविना जीव शांत होईना ।।१।।
प्रीतीनें या, राया करिते मी सेवा ।।
विषयाचें दुःख झालें, माझ्या जीवा ।।२।।
दासी मी आपुलीं, मनमोहना ।।
अगदीच का हो माया मनांत येईना ।।३।।
नव नवतीची, भरा आली काया ।।
प्रीतीनें भोगा, नाहींतर जाईल वाया ।।४।।
जीव झाला घावरा, चैन पडेना ।।
तुम्हावीण दुःख मी सांगू कुणा ।।५।।
नवतीची नार मी, प्रिया उदास नका होऊ ।।
पतिसेवेचा मलां लाभु दे अनुभाऊ ।।६।।
चिमाजी कवीच्या ऐशा खुणा ।।
अल्प कवि, त्याच्या वर्णु किती गुणा ।।७।।

□ □

# काही नामवंत तमाशा कलावंतांचा परिचय

खेड्यापाड्यातील काय किंवा शहरातीलही काय, बहुजनसमाजातील लोक हे काहीतरी करमणुकीसाठी नेहमी भुकेलेले असतात. त्यांची ही भूक, तमाशा या लोककलेचे कलावंत, आपल्या ऐपतीप्रमाणे अत्यंत निष्ठेने भागवीत आलेले आहेत. या कलावंतांची ही एक प्रकारची समाजसेवाच होय. त्यायोगे या कलावंतांचे, त्या समाजाशी नाते जडले जाते. ऋणानुबंध निर्माण होतात. या ऋणानुबंधांबद्दल समाजाने त्यांच्याशी कृतघ्न राहावयास हवे. त्यांचे कौतुक करावयास हवे. त्यांची स्मृती टिकवावयास हवी.

याच भावनेतून इ. स. १८५० ते १९५० या कालखंडातील काही तमाशा कलावंतांचा अल्प परिचय या ठिकाणी करून देण्याचा हा प्रयत्न आहे.

**उमा बाबू सावळजकर**

(मु. सावळज, ता. तासगाव, जि. सातारा)

इ. स. १८५० च्या आसपासचा काळ भेदिक लावण्या आणि सवाल-जबाब यांच्यावर फार भर असलेला असा होता व त्यावरच तमाशाची कसोटी लागत असे. आणि त्यानंतरचा वीस-पंचवीस वर्षांचा काळ हा तमाशाकलेच्या परिवर्तनाचा होता. या परिवर्तनाच्या काळात ज्या धाडशी कलावंतांनी, आपल्या कलागुणांच्या जोरावर, या कलेला बहुजनसमाजामध्ये प्रसारित करून लोकप्रिय केली, त्या कलावंतांमध्ये उमा बाबू सावळजकर यांचे स्थान अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण होते, अशी माहिती मिळते.

उमाजींनी आपला तमाशा चालू करून त्याचे ठिकठिकाणी अनेक कार्यक्रम केले व रसिकांची भरपूर करमणूक करून अफाट लोकप्रियता मिळविली. लोकांनीही त्यांचे खूप कौतुक केले. उमाजी यास ते अगदी डोक्यावर घेऊन नाचले.

उमाजी यांचेनंतर त्यांचे पुत्र तात्या उमाजी हेही एक थोर तमासगीर होऊन गेले. ते शिकलेसवरलेले होते आणि शीघ्र कवीही होते. त्यांनी आपल्या मार्मिक

भेदिक कवनांनी आणि सवाल-जबाबांनी मोठमोठे अटीतटीचे सामने लढवून, पुण्या-मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्र गाजविला आणि त्याकाळी खूप नाव मिळविले.

त्याचप्रमाणे तातोबांचे पुत्र शंकर तातोबा यांनीही आपल्या वाडवडिलांची उज्वल परंपरा काही काळ पुढे चालविली.

अशा प्रकारे हे सावळजकर घराणे तमाशाकलेच्या इतिहासामध्ये फार मोठी प्रतिष्ठा मिळवून राहिलेले आहे. त्यांच्या या परंपरेने करमणुकीच्या द्वारे बहुजन-समाजाची सेवा करून, तमाशाकलेच्या प्रगतीला मोलाचा हातभार लावलेला आहे, याचा विसर जाणकारांस पडू शकणार नाही.

**नामा धुळवडकर**

(मु. धुळवड, ता. खेड, जि. पुणे)

नामा धुळवडकर हे जुन्या काळात होऊन गेलेले एक नामवंत तमासगीर.

तमाशा ही कला नवे रूप आणि आकार धारण करून वाटचाल करीत असता, अंगी कलागुण असलेला माणूस, थोडाच स्वस्थ बसून राहणार आहे ! संधी मिळाल्याबरोबर तो त्यात उडी घेणारच. याच पद्धतीनुसार इतरांच्या बरोबरीने नामदेवराव धुळवडकर यांनीही त्या काळात आपला तमाशा चालू केला.

परंतु त्यांचे नाव झाले ते दुसऱ्याच एका कारणाकरिता. आणि ते कारण होते तमाशा-रंगमंचावरील स्त्री-कलावंताचे पहिले पदार्पण. पुरुष नाच्याच्या ऐवजी, नाचकाम व हावभाव करण्याकरिता आणि गाणे म्हणण्याकरिता, पहिल्या प्रथम एका स्त्री-कलावंताला तमाशामध्ये आणले ते नामदेवराव धुळवडकर यांनीच व ती स्त्री-कलावंत होती गोड गळ्याची, अत्यंत देखणी, नृत्यांगना, सुप्रसिद्ध पवळाबाई हिवरगावकर. आणि तो काळ होता एकोणिसाव्या शतकाच्या अगदी शेवटचा.

परंतु नामदेवरावांच्या समकालीन जे तमासगीर होऊन गेले, त्यांना ही गोष्ट आवडली नाही. बायकांना तमाशात नाचवून पैसे गोळा करणे या तमासगिरांना रुचले नाही. त्यांचा स्वतःच्या कलेवर विश्वास होता. म्हणूनच त्यांनी आपले तमाशे जुन्या पद्धतीने चालू ठेवले. त्यावेळी सर्वांच्या तमाशामध्ये पुरुष नाचेच होते.

असा काही काळ निघून गेला. पुढे तमाशाच्या फडामध्ये एका स्त्री कला-वंताला घेऊन ठिकठिकाणी खेळ करीत राहणे हे काम त्याकाळी सोपे नव्हते आणि वृद्धापकाळामुळे नामदेवरावांना ते झेपण्यासारखेही नव्हते. तशात ही जबाबदारी अंगावर घेऊन फड पुढे चालू ठेवणारी कोणी दुसरी व्यक्तीही पुढे आली नाही. त्यामुळे नामदेवरावांनी तो फड बंद करून टाकला. आणि अशा प्रकारे पवळाबाई या फडातून मोकळी झाल्यावर पठ्ठे बापुराव यांनी तिला आपल्या तमाशात सामावून घेतले.

**हरिबा किवळेकर**
**रामा नामा लवळेकर**

पुणे जिल्ह्यामध्ये किवळे आणि लवळे ही दोन्ही गावे एकमेकांशेजारी आहेत. किवळे गावातील रहिवासी हरिबा किवळेकर यांनी आपल्या नावावर एक तमाशा फड उभा केला. त्यामध्ये या दोन्ही गावांतील कलावंत मंडळी होती. हरिबा किवळेकर हे सरदाराचे, रामा लवळेकर सोंगाड्याचे व नामा लवळेकर खलनायकाचे काम करीत असत.

हरिबा किवळेकर मरण पावल्यावर तोच फड रामा व नामा लवळेकर या दोघांनी आपल्या जोडनावावर चालू करून मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर, अहमदाबाद, मराठवाडा वगैरे भागातून फिरून कार्यक्रम केले व लोकप्रियता मिळविली. रामा लवळेकर मरण पावल्यावर लहूजी हिवरगावकर, सोंगाडे म्हणून या फडात आले. हा तमाशा, पुढे पुणे शहर (आर्यभूषण थिएटर) व पुणे जिल्ह्यात चांगलाच लोकप्रिय झाला. सुभद्रा नावाची हुशार व देखणी नाचणारीण या फडात काम करीत होती. या फडात खलनायकाचे काम करणारे नामा लवळेकर हे तमाशात हंटर मारण्यात हुशार होते. आता अर्जुन लवळेकर हे पुण्यात तोच तमाशा फड आपल्या नावावर चालवीत आहेत.

**शिवा संभा कवलापुरकर**
(मु. कवलापूर, ता. मिरज, जि. सांगली)

शिवा संभा कवलापुरकर या तमाशा फडाचे मालक आणि चालक शिवा आणि संभा हे दोघे सख्खे भाऊ होते. त्यांचे वडील सातू यांचाही अगोदरच्या काळात सातू हिरू या नावाने तमाशा होता. अहमदनगर जिल्ह्यामध्ये दौऱ्यावर असता सातू मरण पावले, परंतु त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यावेळी तो फड बंद पडू न देता चालूच ठेवला. पुढे त्याची पुनर्रचना होऊन शिवा संभा कवलापुरकर या नव्या नावाखाली तो चालू राहिला. त्यामध्ये शिवा सोंगाड्याचे व संभा सरदाराचे काम करीत असत. त्याशिवाय गणपत यळावीकर, तायाप्पा बामणीकर व कृष्णा हे ढोलकी वाजविणारे, चुडाप्पा कवलापुरकर, थकू अंकालखोपकर व परशुराम बामणीकर हे सोंगाडे, साधू कवठेकर गाणारा व लक्ष्मण खाडे-कवलापुरकर हा वगातील भूमिका चांगल्या प्रकारे करणारा, असा चांगल्यापैकी संच होता.

या तमाशा फडाने सादर केलेल्या वगांपैकी काही वग हे (१) महिंदाची नगरी (२) रंगपंचमी (३) हरिश्चंद्र-तारामती (४) विक्रम शशीकला (५) इष्क पाखरू (६) सत्यवान-सावित्री व (७) व्यंकटराव मास्तर असे होते. व्यंकटराव मास्तर या वगातील फौजदाराची भूमिका उत्कृष्ट करून संभा यांनी

नाव मिळविले होते. ते फौजदाराचा अस्सल गणवेश घालूनच रंगमंचावर प्रवेश करीत असत.

काही काळानंतर दौऱ्यावर असतानाच नगर जिल्ह्यातील हरेगाव या गावी १९३७ मध्ये संभा यांचे अचानक निधन झाले. त्यानंतर अंधत्व आल्याने शिवाही तमाशातून निवृत्त झाले. त्यामुळे त्यांच्या पुढील पिढीतील रामचंद्र, शामराव, भिमराव व जुळे बंधू लहू-अंकुश सुप्रसिद्ध (काळू-बाळू) हे आता तो फड पुढे चालवीत आहेत. चार पिढ्या चांगल्या प्रकारे चालू असलेला हा एक नामवंत तमाशा फड आहे.

या तमाशा फडासंबंधी मागील काळातील एक महत्त्वाची माहिती अशी आहे की अस्पृश्यांचे कैवारी आणि महान नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२७ मध्ये महाड (जि. रायगड) मुक्कामी ज्या ठिकाणी मोठी परिषद भरविली (व नंतर चवदार तळ्यावर ऐतिहासिक सत्याग्रह घडवून आणला) त्याच जागेवर या तमाशा फडाचे खेळ होऊन गेल्याचा उल्लेख, त्या सत्याग्रहाच्या अहवालाच्या पुस्तिकेच्या पान सोळावर वाचावयास मिळतो.

(**टीप** :– " महाडच्या दोन ऐतिहासिक परिषदा. " ले. आर. बी. मोरे, (प्रमुख संघटक महाड सत्याग्रह) प्र. सीताबाई मोरे, ४–४–७७)

**कडू–सुभाना**

अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यात प्रवरानदीच्या तीरावर वसलेले कोल्हार हे गांव, एका जुन्या नामवंत तमासगिराची जन्मभूमी आहे. या तमासगिराचे नाव आहे सुभाना ऊर्फ सुभानराव लोखंडे–कोल्हारकर. कडू सुभाना म्हणून पूर्वी गाजलेल्या एका तमाशा फडाच्या नावामध्ये जे सुभाना आहेत, तेच हे सुभाना होत.

या सुभानरावांच्या वडिलांचे नाव भागाजी व आईचे गऊबाई असे होते. भागाजी हे संबळ वाजविण्यात हुशार होते. सुभानरावही संबळ वाजविण्यात, कोणीही न शिकविताच, आपल्या वडिलांप्रमाणे हुशार झाले. त्याशिवाय त्यांना ढोलकी व हलगीही चांगल्या तऱ्हेने वाजविता येत असे.

दरवर्षी होणाऱ्या त्यांच्या गावच्या जत्रेतून अनेक तमाशांचे कार्यक्रम, लहानपणापासून पाहात आल्यामुळे, त्यांना तमाशाकलेची आवड निर्माण झाली व आपणही अशा तऱ्हेचा तमाशाचा फड उभारावा असे वाटू लागले. म्हणून त्यांनी आपला भाऊ मुक्ताजी व चुलतभाऊ कडू यास सोबत घेऊन आपला स्वत:चा 'कडू-सुभाना' या नावाखाली तमाशा फड उभा करण्याचे ठरविले व त्याप्रमाणे गंगाराम आणि

मनोहर लोखंडे या आपल्याच गावच्या दोन देखण्या मुलांस नाच्याचे काम शिकवून, इतर सवंगडी तयार करून त्यांनी तमाशा चालूही केला.

वांबुरी (ता. राहुरी, जि. अहमदनगर) चे श्री. काशीनाथ कोंडाजी पाटील यांनी आपले वडील कोंडाजी पाटील यांच्या तोंडून वेळोवेळी ऐकलेली माहिती अशी आहे की सुभानराव कोल्हारकर हे एक अष्टपैलू तमाशा कलावंत होऊन गेले आहेत. ते शीघ्रकवी होते. त्यांनी अनेक कवने लिहिली आणि आपल्या तमाशांतून लोकांस ऐकवून त्यांच्याकडून वाहवा मिळविली. त्यांच्या तमाशाचे कार्यक्रम पाहावयास लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटत. या तमाशामध्ये गंगाराम लोखंडे हा देखणा व हुशार नाच्या होता, साजशृंगार चढविल्यावर तो अगदी हुबेहूब स्त्रीसारखाच दिसे. त्याच्या तोडीचा दुसरा नाच्या झाला नाही असे म्हटले जाते. तो रंगमंचावर आल्याबरोबर टाळी घेत असे. कोंडाजी पाटील आणि सुभानराव हे एकमेकांचे जिवलग मित्र होते. वांबुरीच्या यात्रेचे दरवर्षाचे तमाशाचे आमंत्रण सुभानराव यांस ठरलेले असे. इंदूर आणि ग्वाल्हेर या संस्थानांच्या श्रीमंत होळकर महाराज आणि शिंदे सरकार यांच्या राजदरबारांत सुभानराव कोल्हारकर यांच्या तमाशाचे कार्यक्रम झालेले होते. आणि त्यावेळी त्यांना भरजरी पोशाख आणि ताम्रपट देऊन त्यांचा बहुमानही करण्यात आला होता.

अशा या थोर कलावंताचे इ. स. १९२९ मध्ये निधन झाले. त्यांच्या निधनानंतर गावकरी मंडळींनी त्यांचे स्मारक उभारलेले असून कोणताही तमाशाचा फड या गावात आल्यावर या स्मारकाचे ठिकाणी जाऊन प्रथम डफावर थाप मारून त्यांना मानवंदना दिल्याखेरीज आपले कार्यक्रम चालू करीत नाही.

### शाहीर पठ्ठे बापुराव

(गाव हरजाक्ष रेटरे, ता. वाळवे, जि. सातारा)

सुप्रसिद्ध तमासगीर शाहीर पठ्ठे बापुराव यांचे मूळनाव श्रीधर बाळकृष्ण कुलकर्णी असे होते. त्यांचे वडील कृष्णाजीपंत हे गावातील भिक्षुकीवर आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असत. या गावांमध्ये महार मंडळीचा एक तमाशा होता. त्यांची गाणी ऐकण्याकरिता एक मुलगा नेहमी त्या ठिकाणी येई. काही दिवसांनी तो त्यांच्यातच बसून त्यांच्या सोबत ती गाणी म्हणू लागला. तो मुलगा म्हणजे इतर दुसरा कोणी नसून वर नमूद केलेले श्रीधर बाळकृष्ण कुलकर्णी ऊर्फ शाहीर पठ्ठे बापुराव हेच होत.

हा प्रकार जेव्हा श्रीधर यांच्या कुटुंबियास समजला, तेव्हा त्यांना काळजी उत्पन्न झाली. त्यांनी श्रीधर यास समजाविण्याचा प्रयत्न केला. तमाशाचे वेड त्याच्या डोक्यातून कायमचे निघून जावे व त्याने आपल्या संसारात रमावे यासाठी

त्यांनी त्याचे लग्नही करून दिले. पण कशाचाच उपयोग झाला नाही. श्रीधर याचे तमाशाचे आकर्षण काही कमी झाले नाही.

काही दिवसांनंतर श्रीधर (बापुराव) गुपचूपणे घरातून निघून मुंबईत आले आणि त्यांनी आपले बस्तान ग्रँटरोडवरील बटाटयाच्या चाळीत ठोकले. बापुराव सुशिक्षित होते. त्यांना काव्याची आवड होती. त्यांनी चालू असलेल्या इतर तमाशा फडांना भराभर लहानमोठी कवने तयार करून देण्याचा सपाटा चालविला व आपले आसन स्थिर केले. लोकांना त्यांची गाणी आवडू लागली. काही दिवसांनंतर त्यांनी साथीदार जमा करून आपला स्वतःचा तमाशा फड चालू केला. तमाशा-क्षेत्रातील त्यांची एकंदर कामगिरी पाहून प्रेक्षकांनीच त्यांना "शाब्बास पठ्ठे" अशी शाबासकी दिली व त्यावरूनच त्यांना 'पठ्ठे बापुराव' असे नाव पडले. त्या-वेळेस नाना धुळवडकर यांच्या तमाशामध्ये पवळाबाई हिवरगावकर ही नाचणारीण काम करीत होती. तिचे नृत्य व हावभाव पाहिल्यावर व गाणे ऐकल्यायर ती आपल्या तमाशात असावी असे बापुरावास वाटू लागले, परंतु ते त्यावेळी शक्य नव्हते. काही काळानंतर जेव्हा नाना धुळवडकर यांनी आपला तमाशा बंद केला तेव्हा पवळाबाई मोकळी झाल्यावर बापूरावांनी तिला आपल्या फडात सामील करून घेतले.

पवळाबाई ही आकर्षक शरीरयष्टीची, गोड गळयाची व नृत्यकलानिपुण बाई होती. तिच्या सौन्दर्यापासून स्फूर्ती घेऊन बापुरावांनी पुष्कळ लावण्या व इतर कवने लिहिली व पवळाबाईने ती रंगमंचावर साकार करून प्रेक्षकांना खूश केले. तशात पवळाबाईही महारीण व बापुराव ब्राम्हण. या दोघांची युती हाही मोठा कुतूहलाचा प्रश्न त्यावेळी झाला होता. यामुळे या तमाशाबद्दलची लोकांची उत्सुकता फारच वाढली व कार्यक्रमांना दिवसेंदिवस गर्दी वाढत गेली. अशा प्रकारे कीर्ती आणि द्रव्य यांचा त्यांना भरपूर लाभ झाला. परंतु काही वर्षांनंतर पवळाबाई ही बापुरावांच्या तमाशातून निघून गेली. त्यामुळे बापुरावांनी दुसऱ्या नाचणारणीला घेऊन आपला तमाशा चालू करण्याचा प्रयत्न केला; पण त्यात पूर्वीसारखा रंग भरला नाही म्हणून त्यांनी तो कायमचाच बंद करून टाकला आणि आपले अखेरचे दिवस लोकाश्रयावर घालवून दि. २२-१२-१९४५ रोजी आपली इह-लोकीची यात्रा संपविली.

**दगडू साळी (तांबे) शिरोलीकर**

(मु. शिरोली, ता. जुन्नर, जि. पुणे)

दगडू बाबा साळी शिरोलीकर हे तमाशामध्ये जुन्या पिढीत अतिशय गाज-लेले व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचा अत्यंत भारदस्त असा तमाशा फड होता. त्यात ते

सोंगाड्याची भूमिका उत्कृष्ट पार पाडीत असत. लोक त्यांना 'सोंगाड्याचा सम्राट' म्हणत. ते हजरजबाबीपणात, शाब्दिक कोट्या करण्यात व दुसऱ्याची नक्कल करण्यात फार वाकबगार होते. रंगमंचावर आल्याबरोबर ते लोकांना हसायला लावीत व त्यांचेकडून टाळ्या घेत.

दगडूबाबा चांगल्यापैकी कवीही होते. त्यांनी भेदिक लावण्या खूप लिहिल्या होत्या. तसेच सवाल-जबावाचे अनेक सामनेही गाजविले होते. त्यांचे गाजलेले वग (१) राजा हरिश्चंद्र (२) राजा श्रीयाळ (३) गोरा कुंभार (४) अक्कल आणि लक्ष्मी (५) मनोहर गिरधर आणि (६) पतिव्रता असे होते.

दगडूबाबा यांचा तमाशा फड त्यांचे पश्चात त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव दत्तोबा तांबे यांनी पहिल्याइतक्याच तोलामोलाने पुढें चालविला.

**हरिबा वडगांवकर**

(मु. आनंद वडगांव, ता. जुन्नर, जि. पुणे)

'गाढवाचे लग्न' या लोकनाट्यामुळे दादू इंदुरीकर हे विस्मृतीच्या अंधारातून प्रकाशाच्या झोतात आले. त्यांना आपल्या अंगचे विविध कलागुण आणि अभिनय कौशल्य दाखविण्यास भरपूर वाव मिळाला. आणि अमाप प्रसिद्धी व मानमरातब यांचा लाभ झाला. हे सर्व जरी खरे असले, तरी मुळात हे लोकनाट्य होते हरिबा वडगांवकर यांचे आणि त्यांचे पूर्वीचे नाव होते 'सावळ्या कुंभार'.

दादू इंदुरीकर यांनी साकार केलेली सावळ्या कुंभाराची भूमिका ही हरिबा वडगांवकर यांनी त्यापूर्वीच गाजविली होती आणि तमाशाच्या क्षेत्रामध्ये आपण एक श्रेष्ठ कलावंत म्हणून आपले नाव प्रस्थापित केलेले होते. या वगाच्या पहिल्या प्रवेशातच लुगड्याचे फटकूर खांद्यावर टाकून हरिबा वडगांवकर प्रेक्षकांच्या समोर रंगमंचावर नुसते उभे राहिले तरी ते हमखास टाळी घेत असत, इतके त्यांनी प्रेक्षकांना आपल्या अभिनयाने भारून टाकलें होते, असे सांगतात.

दादू इंदुरीकर हे हरिभाऊ वडगांवकरांना गुरुस्थानी मानीत. बोलण्याच्या ओघात हरिभाऊंचे नाव जरी निघाले तरी आपली मान विनम्र करून, दादोबा त्यांना मनोमन अभिवादन करीत व इतरांना सांगत की, असा सोंगाड्या झाला नाही व होणार नाही. अशाप्रकारे हरिभाऊंबद्दलचा आपला आदरभाव ते व्यक्त करीत असत. अशा परिस्थितीत हरिभाऊ वडगांवकरांबद्दल अधिक काही लिहिण्याची आवश्यकता आहे असे वाटत नाही.

हरिबा वडगांवकर यांचे संपूर्ण नाव हरिबा गेनू काशीकेदार असे होते. ते आपल्या वडिलांचे एकुलते एक चिरंजीव होते. त्यांना लहानपणापासूनच कलेची

आवड असल्यामुळे, तारुण्यात पदार्पण केल्यावर त्यांनी समवयस्क मंडळी जमा करून आपला स्वत:चा तमाशा फड उभा केला व त्याचे ठिकठिकाणी प्रयोग करून तो अल्पकाळातच लोकप्रिय केला.

हरिबा वडगांवकर हे चांगल्यापैकी कवीही होते. त्यांनी अनेक गण, गवळणी व लावण्या आणि काही वगही लिहिले व आपल्या तमाशांतून वापरले. "सावळचा कुंभार" आणि "सूर्य कसा थांबला" हे त्यांचे फार गाजलेले दोन वग होते. या वगांतून त्यांनी प्रेक्षकांची भरपूर करमणूक केली. आपल्या कलेशी अत्यंत एकरूप झालेला हा थोर कलावंत प्रसिद्धीच्या वलयात असतानाच १९४० मध्ये निधन पावला.

हरिभाऊंच्या निधनानंतर वीस–पंचवीस वर्षांनी दादू इंदुरीकर, कै. शंकर घाणेकर आणि मुंबईतील लालबागच्या हनुमान थिएटरचे मालक श्री. मधुकरराव नेराळे, यांनी हरिभाऊंचा 'सावळचा कुंभार' हा वग, 'गाढवाचे लग्न' या नव्या नावाखाली बसविला व जनताजनार्दनापुढे सादर केला; तो प्रेक्षकांच्या सर्व थरात अतिशय लोकप्रिय ठरला. या वगाने दादू इंदुरीकर यास केवढ्या महत्पदास पोहोचविले, याची कल्पना, या परिचयलेखाच्या सुरवातीच्या मजकुरावरून वाचकांस येऊ शकेल.

**खंडू दगडू शिवणेकर**

(मु. शिवणे, ता. वडगांव, जि. पुणे)

खंडू शिवणेकर हे जुन्या काळात एक नामवंत तमासगीर म्हणून होऊन गेलेले आहेत. त्यांनी खंडू दगडू शिवणेकर या नावाखाली तमाशा फड चालविला आणि त्याचे प्रयोग मुंबईच्या वांगडीवाले थिएटरातून करून लोकप्रिय केले. या तमाशामध्ये दशरथ देवठणकर व लहुजी हिवरगांवकर यांच्यासारख्या गुणी कलावंतांनी कामे केली होती. त्यावेळी ही सर्व मंडळी फॉकलंड रोडवरील बटाट्याच्या चाळीमध्ये राहात असत.

मुंबईत प्रयोग चालू असतानाच काही कलावंतांनी हा फड सोडला आणि पुण्याला जाऊन तेथे एका नव्या स्वतंत्र फडाची उभारणी केली. अशा प्रकारे महत्त्वाचे कलावंत एकदमच निघून गेल्यामुळे शिवणेकरांचा तमाशा विस्कळीत होऊन बंद पडला तो पुन्हा चालू झाला नाही.

**भाऊ फक्कड**

( मु. उंबारणे, ता. कराड, जि. सातारा )

भाऊ फक्कड हे एक श्रेष्ठ तमासगीर होऊन गेले. त्यांनी फक्कड कवने लिहिली. फक्कड लावण्या लिहिल्या, फक्कड वग लिहिले. आणि तमाशातून

कामेही फक्कड केली. म्हणूनच लोकांनी त्यांचे नाव फक्कड असे ठेवले व अशा रीतीने ते भाऊ फक्कड झाले. संपूर्ण तमाशाक्षेत्रामध्ये ते भाऊ फक्कड याच नावाने पुढे ओळखले जाऊ लागले. परंतु त्यांचे खरे नाव भाऊ मालोजी भंडारे असे होते.

भाऊ फक्कड हे सुशिक्षित होते. रेल्वेमधील आपली नोकरी सोडून देऊन ते तमाशाकलेकडे वळले, असे सांगतात. त्यांनी गण, गौळणी व वग लिहिले आणि ते शिवा संभा कवलापुरकर व बाबुराव कुपवडेकर यांनी आपल्या तमाशांतून लोकप्रिय केले. शिवा मेढेकर यांनीही त्यांची गाणी आपल्या कार्यक्रमांतून म्हटली. भाऊ फक्कड यांची काव्यरचना भारदस्त होती. 'पाच जातींच्या पाच गौळणी' ही एक अभिनव गौळण त्यांनी रंगमंचावर आणून, एकाच चालीचे एक गाणे, पाच जातीच्या पाच गौळणींकडून, पाच भाषेत म्हणवून घेतले. ही त्यांची गौळण सुप्रसिद्ध सोंगाडे काळू बाळू कवलापुरकर हे आपल्या तमाशातून अजूनही अधून-मधून सादर करीत असतात. तसेच शिवा संभा कवलापुरकर यांनी त्याकाळी सादर केलेला भाऊ फक्कड यांचा 'व्यंकटराव मास्तर' हा वग फार गाजला होता व त्यातील संभा कवलापुरकर यांची फौजदाराची भूमिकाही लोकांना फार आवडली होती.

भाऊ फक्कड यांची काव्यरचना कोल्हापूरचे छत्रपती राजर्षी शाहूमहाराज यांस आवडल्यामुळे त्यांनी भाऊ फक्कड यांस बोलावून घेऊन त्यांचेकडून ब्राह्मणेतर चळवळीच्या प्रचारकार्याला पोषक अशी काही खास गाणी तयार करून घेतली होती.

भाऊ फक्कड हे अंगी विविध कलागुण असलेले एक व्यासंगी कलाकार होते. ते उत्तमपैकी गाणारे नट होते. प्रथम त्यांनी शिवा संभा कवलापुरकर या फडामध्ये काम केले. नंतर आपला स्वतःचा तमाशा उभा करून तो लोकप्रिय केला आणि त्यानंतर इतर फडांना त्यांनी फक्त कवने आणि वगच लिहून दिले. आपल्या अखेरच्या काळामध्ये ते शेवटपर्यंत बाबुराव कुपवडेकर यांच्या फडासोबतच राहिले. असेच एकदा कुपवडेकर यांच्याबरोबर दौऱ्यावर असता ते आजारी पडले आणि १९४२ मध्ये मिरज रुग्णालयात निवर्तले.

भाऊ फक्कड यांनी लिहिलेली पंचरंगी गौळण अशी आहे–

पाच जातिच्या आम्ही गौळणी
जातो विकायला दही–दूध–लोणी

(मराठी गौळण)

सोड सोड कृष्णा माझी वाट
विकायला जाते, भरून दह्याचा माठ
आम्हा गौळणींची, का पुरविशी पाठ
सोड रस्ता माझा, घनःश्यामा
पिंड ब्रम्हांड अखंड नामा
रागे भरून शिक्षा करील, माझा सासरा
जावा, नणंदा रागीट, शिव्या देईल दीर दुसरा
नको त्रास देऊ यादवा, तुझा आम्हां आसरा
तू शहाणा असून, श्रीरंगा, करिशी का दंगा, सारंगपाणी
आम्ही जातो विकायला, दही–दूध–लोणी

(हिंदी गौळण)

सुन सुनरे कन्हैया मेरी बात
बेपार करके पेट भरती हूं ब्रजवासी मेरी जात
लाचार हो कर खडी हूं जोड के दोनों हात
छोड रास्ता कृष्ण-गिरिधारी
मै कहती हूं राधा प्यारी
बडा भारी होता है घडा, बोझ मेरे सरको
ना हात लगाओ मेरे अंगको, जरा दूर सरको
मेहरबान हमें जाने दो, मथुरा बझारको
तेरी चाल मुझे नापसंद, सावलिया किसन, खूब पहचानी
हम जाते हैं बेचनेको दही–दूध–लोणी.

(गुजराथी गौळण)

जौरे माधवजी, सांभळ बात मारी
गोरसभर घडो माथापर, जवादे मथुरापुरी
शाम काही तारी मारा उपर बलजोरी.
वहु सास हटेली मारी
हू बात कहू तारी सारी
पहलू खराब छे, मारा मरद दर्दाथे, घरमो
वानुयनो अरज सांभळो, ना अंतर शरमो
मारी मिजास नासे ज्यासिन गोकूळ शर्मो
येवी जुलूम तारा कानुडा, ज्योति दर्दडा, तमारी करणी
आम्ही जातो विकायला दही दूध लोणी

(कोकणी गौळण)

आरे गोविंदा गोपाला, सांगतय तुशी
मना जाऊदे मथुरेला, बाजार करायाशी
मोप वज्जा झालाय, फोड आलाय, माझ्या टकल्याशी
आन ह्या दिसताय कानाय तुझ्या डोल्याशी
सोड रस्ता माझा गोपाला, गोकुली झाला घोटाला
माझा नवराच मारतय मना, रोज संध्याकाळी
ता म्हासूर समद्या गोकुली, भांब्या गवली
सांजवल, जाऊ दे मना, दे माझी रोवली
नंदरायाच्या मुला, किसन गोपाला, यगली तुझी करनी
आम्ही जातो विकायला दही-दूध-लोणी

( कानडी गौळण )

केळकेळरी देवरून मातवंड
ननकय हिडब्याड बीड रुक्मिणी गंड
ना होगत्यान माडतनी संगट झगडा बितंड
नचसिरबीड गोविंदा हिग्याक माडती चंगा
कै बिडुर्बतिनु शरण रुक्मिणी गंडा
दिना दिना माडती संगट झगडा वितंडा
यल्लारू देगल्वग कृपाळू तमाम चंडा
कुडब्याड त्रासनीन जोड कयट निनखोड कृष्णाभिमानी
आम्ही जातो विकायला दही–दूध–लोणी.

**भागू-नागू माळी**

भागू आणि नागू माळी हे दोघे बापलेक. दोघेही विनोदी भूमिका करीत· त्यांनी आपला तमाशा मुंबईच्या हसनशेठ बांगडीवाल्यांच्या ठेकेदारीत चालविला होता.

रंगमंचावर काम करीत असताना ते, प्रत्यक्षात असलेले आपले बापलेकांचे नाते विसरून जाऊन अगदी मित्रांसारखे मोकळेपणाने वागत, एकमेकाला शिव्याही भरपूर देत आणि एकमेकाशीं गुद्दागुद्दीही करीत. प्रेक्षकांना पाहावयास हीच मोठी गमतीची गोष्ट वाटे.

त्यांच्या तमाशामध्ये तीन नाचणारणी होत्या.

**रामा कुंभार वर्धनगडकर**

रामा कुंभार वर्धनगडकर ही तमाशा व्यासंगांतील एक थोर व्यक्ती आहे. त्यांनी दीर्घकाळ तमाशाकलेची सेवा केली आणि आपल्या कलेद्वारे रसिकांचे भरपूर रंजन करून त्यांच्या हृदयात मानाचे स्थान पटकाविले. या कामात त्यांना विठाबाई व चंद्रा या दोन नाचणारणींची चांगली साथ मिळाली होती.

रामा कुंभार हे ढोलकी व हलगी चांगल्या प्रकारे वाजवून प्रेक्षकांना खूष करीत असत. त्यांनी आपला तमाशा पुणे, सातारा, कोल्हापूर, नाशिक, मुंबई आदी भागांतून लोकप्रिय केला होता. चिलया बाळ व हरिश्चंद्र-तारामती हे त्यांचे वग गाजले होते. पुढे काळ बदलल्यावर रामा कुंभार हे या व्यवसायातून निवृत्त झाले.

साधारणपणे पन्नास वर्षांपूर्वी, कोकणातल्या एका दौऱ्याचेवेळी रामभाऊ कुंभार यांनी, खेड्यापाड्यांतून आपला हरिश्चंद्र-तारामती हा वग फार लोकप्रिय केला होता तो अजूनही काही जुन्या हयात असलेल्या प्रेक्षकांच्या चांगलाच स्मरणात आहे.

**बाबूराव पुणेकर**

बाबूराव पुणेकर हे एक जुने आणि जाणते तमाशा कलाकार आहेत. त्यांचे संपूर्ण नाव बाबूराव मारुतराव मोकाशी, पुणेकर असे असून ते पुणे जिल्ह्यातील कोंढवे यां गावचे रहिवाशी आहेत.

सुरवातीच्या काळात त्यांनी कै. केशवराव जेधे यांच्या प्रेरणेने सत्यशोधकी तमाशामध्ये प्रवेश केला आणि आपल्या अंगच्या कलेद्वारे समाजजागृतीच्या कार्याला हातभार लावला. काही काळानंतर त्यांनी पूर्णपणे तमाशाकलेलाच वाहून घेऊन अनेक वग, फार्स, लावण्या व पोवाडे रचले आणि रंगमंचावर सादर केले. बाबूराव आपल्या वगांतून सरदाराची भूमिका करीत. ते गाणीही म्हणत व ढोलकीही वाजवीत. त्यांचे वग चांगलेच लोकप्रिय झालेले होते. त्यांच्या तमाशामध्ये अहमद इस्लामपूरकर हे खलनायकाचे काम करीत आणि हलगीही वाजवीत. दुसरा खलनायक विष्णू सांगलीकर हा होता. या फडामध्ये शांता, तारा व द्वारका अशा तीन नाचणारणी होत्या. त्यांपैकी शांता ही राणीचे काम उत्तम करीत असे. राणी म्हणून ती चांगली शोभून दिसत असे.

शिंगणापूरची होळी, मल्हारराव होळकर, तानाजी मालुसरे, मुंबईचा मवाली हे त्यांचे गाजलेलें वग होते.

महाराष्ट्र शासनाने १९७७ मध्ये नाट्य, संगीत, नृत्य इत्यादी विविध कलांतील ज्येष्ठ कलावंत मास्टर दत्ताराम, ललिता पवार, रोहिणी भाटे, राजा परांजपे,

नौशाद, अंबुदेवी विभुते (बुधगावकर) आणि मो. ग. रांगणेकर यांचा सत्कार केला. त्यांच्याबरोबरच, तमाशाकलेची दीर्घकाळ निष्ठापूर्वक सेवा करणारे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ तमासगीर बाबूराव पुणेकर यांचाही सत्कार करण्यात आला. त्याच-प्रमाणे शासनानेच आयोजित केलेल्या तमाशा कलाकारांना शिक्षण देणाऱ्या शिबिरावर त्यांची निवड करण्यात आली. हा बाबूराव पुणेकर यांचा आणि तमाशा-कलेचाही उचित असाच गौरव होय, असे म्हणावयास हरकत नाही.

**शंकर औसरीकर**

(औसरी, ता. खेड, जि. पुणे)

शंकर औसरीकरांचा तमाशा बराच गाजलेला होता. या फडामध्ये दोन माणसे अत्यंत महत्त्वाची होती. एक स्वतः शंकरराव औसरीकर आणि दुसरे गुणाजी मास्तर नारायणगांवकर. ह्या दोघांनी या तमाशाला चांगली रंगत आणली होती.

शंकरराव औसरीकर हे अष्टपैलू कलावंत होते. ते ढोलकी उत्तम वाजवीत आणि सोंगाड्याचे काम करीत. मृदुंग वाजविण्यातही ते निष्णात होते. गुणाजी मास्तर नारायणगांवकर हे पूर्वी प्राथमिक शाळेत शिक्षक होते. पण कलेच्या हौसे खातर त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन तमाशाचा व्यासंग पत्करला. ते तमाशामध्ये खलनायकाचे काम करीत. गुणाजी मास्तर हे चांगल्यापैकी कवीही होते. या तमाशासाठी त्यांनी अनेक कवने केली, त्याप्रमाणे वगही लिहिले.

या दोघांशिवाय शंकरराव औसरीकरांचे दोन भाऊ संभाजी व रवजी आणि मुलगे कुशाबा व गेनुजी हे ही या तमाशात महत्त्वाची कामे करीत. कुशाबा हा आपल्या वडिलांप्रमाणेच ढोलकी वाजविण्यात पटाईत आहे. त्याने उत्कृष्ट ढोलकी-वादनपटुत्वाबद्दल राष्ट्रीय सुवर्णपदक मिळविलेले आहे. त्याचप्रमाणे दादू इंदुरीकर यांच्या 'गाढवाचे लग्न' या लोकनाट्यातही त्याने ढोलकी वाजविली आहे.

स्वतःचा फड बंद केल्यावर आनंदा चांदोलीकर यांनीही या तमाशात काही काळ काम केले.

पुढे शंकरराव औसरीकर निधन पावल्यावर गुणाजी मास्तर नारायणगांवकर यांनी तो तमाशा काही दिवस चालू ठेवला होता, परंतु त्याचा मेळ न बसल्यामुळे तो कायमचाच बंद पडला.

**शेकू शिवा घाटनांद्रेकर**

(घाटनांद्रे, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली)

शेकू आणि शिवा हे दोघे सख्खे बंधू. इतरांप्रमाणेच या दोघांनीही आपल्या जोडनावावर तमाशा फड उभारला. शेकू हे सरदाराचे काम करीत आणि शिवा

सोंगाड्याचे त्यांनी तमाशाच्या मोसममध्ये फिरतीवर राहून महाराष्ट्रभर आपले कार्यक्रम केले व प्रसिद्धि आणि लोकप्रियता मिळविली. (१) मराठ्याची मुलगी (२) पायाचे पाणी (३) चतुरसेन अर्थात इष्कपाखरू हे त्यांनी लावलेल्यापैकी काही वग होते.

या दोघांच्या पश्चात आता शेकू यांचा मुलगा वसंत याने आपल्या भावांच्या सहकार्याने तोच फड पुढे चालू ठेवलेला आहे.

**सावळा औरंगपूरकर**

तमाशाचा फड उभा करायचा म्हटले म्हणजे मालक किंवा चालक यांस मुळात अभिनयाची जाण असावी लागते. लोकांना आकर्षित करून घेणारे रूप किंवा शरीरयष्टी त्याच्यापाशी असावी लागते. त्याला गाणे यावे लागते किंवा निदान चांगले वाद्यवादन तरी यावे लागते. परंतु यांपैकी एकही गुण अंगी प्रकर्षाने नसताना आपल्या बुद्धिमत्तेवर व कल्पकतेवर विसंबून सावळा औरंगपूरकर यांनी आपला तमाशा फड उभा केला आणि तो यशस्वी करून दाखविला.

हा फड उभा करण्यापूर्वी त्यांनी दगडू साळी शिरोलीकर यांच्या फडात आणि इतर ठिकाणीही काम केले होते. त्या सर्व ठिकाणचा अनुभव जमेस धरून त्यांनी आपले सोंगाड्याचे काम नाविन्यपूर्ण केले आणि लोकांकडून वाहवा मिळविली. त्यांचे वग आणि त्यातील त्यांचे काम पाहावयास प्रेक्षक उत्सुक असत. सावळाराम बुवांनी लावलेले वग (१) मल्हारी मार्तंड (२) अलिबाबा आणि चाळीस चोर (३) उमाजी नाईक व (४) शामसुंदर असे होते.

मल्हारी मार्तंड या वगात सावळारामबुवा रंगमंचावर सुरवातीला मुरळ्या नाचवीत आणि मग त्यातून तो वग चालू करीत. त्यामुळे वाघ्या-मुरळीचा सुंदर नाच आणि गाणे पाहावयास व ऐकावयास मिळे. चाळीस चोरांसह अलिबाबा यास तमाशाच्या मराठी रंगमंचावर आणणारे सावळा औरंगपूरकर हेच बहुधा पहिले तमासगीर असावेत. या वगात ते वरून उडी मारून रंगमंचावर प्रवेश करीत. शामसुंदर हा वग सुगंधाबाई जयसिंगपुरकर यांच्याबरोबर ते संयुक्तरीत्या लावीत असत.

असा हा तमाशाक्षेत्रांतील एक हुशार आणि कल्पक कलावंत अल्पकाळातच १९४४ मध्ये निधन पावला.

**भाऊ बापू मांग नारायणगांवकर**

(नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे)

भाऊ बापू नारायणगांवकर यांचा तमाशा लोकमान्यता व राजमान्यता पावलेला असा होता.

भाऊ आणि बापू यांनी आपल्या भरभराटीच्या काळात, सबंध महाराष्ट्रभर वारंवार दौरे काढून लोकप्रियता मिळविली होती. रसिक प्रेक्षकांनीही त्यावेळी त्यांचे खूप कौतुक केले. सरकारदरबारी त्यांना मानमरातब मिळाले. तसेच त्यांच्या तमाशाने, आपल्या कलागुणांच्या जोरावर, तमाशाक्षेत्रामध्ये पहिल्याप्रथम राष्ट्रपति-पदक मिळविण्याचा मान पटकाविला. अशाप्रकारे तमाशा फड नामवंत ठरला होता.

या फडातील सर्व महत्त्वाचे कलावंत हे एकाच कुटुंबातील होते. भाऊ (चुलते), बापू आणि सावळाराम (पुतणे), शांताबाई (भाऊंच्या पत्नी), अनसूया (बापूंची पत्नी), शंकर (भाऊंचा मुलगा) आणि मनोरमा, विठा आणि केशर (भाऊंच्या तीन कन्या) असा हा परिवार होता. भाऊ हे फडाचे प्रमुख चालक होते. बापू सरदाराचे काम करीत असत. तानाजी मालुसरे हा त्यांचा गाजलेला वग होता. त्यामध्ये भाऊ तानाजीची आणि बापू छत्रपती शिवाजीमहाराजांची सुंदर भूमिका करीत असत.

भाऊ, बापू, सावळाराम, शांताबाई, अनसूया आणि सोंगाड्या म्हणून काशीनाथ यांनी या तमाशामध्ये चांगली कामे करून एकेकाळी हा तमाशा गाजविला होता. भाऊंचे निधन झाल्यानंतर तो तमाशा बापू आणि शांताबाई यांनी पुढे चालविला. परंतु बापूही गेल्यानंतर तो ढासळला व बंद पडला.

तथापि भाऊंच्या कर्तबगार कन्या मनोरमा व विठा यांनी, मनोरमा भाऊ नारायणगांवकर व विठा भाऊ नारायणगांवकर असे दोन स्वतंत्र फड निर्माण करून आपल्या वडिलांची परंपरा समर्थपणे पुढे चालविली आहे.

**बाबूराव कवठेकर**

बाबूराव कवठेकर हे त्याकाळच्या तरुण पिढीतील एक होतकरू असे तमाशा कलावंत होते. मुंबईचे ठेकेदार हसनशेठ बांगडीवाले यांनी केलेल्या आर्थिक मदतीच्या साहाय्याने त्यांनी एक नवा तमाशा फड उभा केला आणि त्यांच्याच थिएटरातून त्या तमाशाचे प्रयोग चालू केले. या तमाशामध्ये बाबूराव कवठेकर सरदाराचे काम करीत. ते चांगल्यापैकी नट होते व गाणी चांगली म्हणत. सरदाराच्या कामाला योग्य अशी आकर्षक शरीरयष्टीही त्यांना लाभली होती.

बाबूराव कवठेकरांनी आपले वग नाटकी पद्धतीने बसवून त्यामध्ये आकर्षकता वाढविली. त्यामुळे ते लोकांना आवडले. बांगडीवाले शेठ यांनी कपड्यांच्या आणि सजावटीच्या बाबतीत या वगामध्ये बाबूरावांना कसल्याही प्रकारची कमतरता भासू दिली नाही. त्यांना लागत असलेली प्रत्येक वस्तू बांगडीवाले यांनी उपलब्ध करून दिली होती. बाबूरावांच्या कामावर लोक खूष होते. अण्णा कारवीकर आणि

चंद्रा तिसंगकर या गुणी कलावंतांनी बाबूरावांना चांगली साथ दिली होती. चंद्रा ही हुशार नाचणारीण होती. ती राणीचे काम चांगले करीत असे. सत्यवान-सावित्री मुंबईचा मवाली, दुष्टबुद्धी प्रधान वगैरे वग त्यांनी सादर केले होते.

परंतु दुर्दैवाने बाबूराव कवठेकर हे अगदी अकालीच निधन पावले. त्यांच्या निधनानंतर अण्णा कारवीकर आणि चंद्राबाई तिसंगकर यांनी हा तमाशा चांगल्या तऱ्हेने पुढे चालविला. अगदी पहिल्यासारखाच रंग त्यामध्ये भरला होता.

**उमा आनंदा चांडोलीकर**

(मु. चांडोली, ता. आंबेगांव, जि. पुणे)

उमा आणि आनंदा हे दोघे चुलत बंधू. त्यांनी आपल्या जोडनावावर तमाशा फड चालविला. परंतु काही काळानंतर त्यांनी वेगळे होऊन आपले स्वतंत्र असे दोन फड निर्माण केले. उमा यांनी आपले बस्तान पुण्यात बांधले आणि आनंदा यांनी मुंबईला.

उमा हे आपल्या तमाशात सोंगाड्याचे काम करीत असत. लहू-अंकुश आणि भक्त दामाजी हे त्यांचे गाजलेले वग होते.

आनंदा चांडोलीकर यांचा तमाशा मुंबईत चांगलाच लोकप्रिय झाला होता ते सरदाराचे काम फार छान करीत. आपल्या उंच, धिप्पाड व आकर्षक शरीरयष्टीने आणि पहाडी आवाजाने त्यांनी प्रेक्षकांस भारून टाकले होते. त्यांचा खास प्रेक्षकवर्ग तयार झाला होता.

या तमाशात सटवा चांडोलीकर सोंगाड्या, सावित्र्या चांडोलीकर ढोल्या आणि तुकाराम चांडोलीकर सावळचा व चंदर हे नाचे, अशी मंडळी होती. त्यांनी लावलेले वग (१) रायगडाला जाग आली (२) सरदाराला फाशी (३) सति सुलोचना (४) औट घटकेचा राजा व (५) दीडशहाणा असे होते.

सति सुलोचना या वगामध्ये त्यांनी आपल्या कल्पकबुद्धीने, धडावेगळ्या शिराला म्हणजे मुंडक्याला रक्ताने भरलेल्या ताटात ठेऊन, रंगमंचावर बोलायला लावले व प्रेक्षकांना चकित केले. अशाप्रकारचे ट्रिकसीन्स यापूर्वी तमाशात कोणी वापरले नव्हते. हा सर्वस्वी नवीनच प्रकार होता. त्यामुळे हे घडते कसे हे लोकांस समजत नसे व म्हणून त्यांचे कुतूहल वाढे.

सति सुलोचना हा वग रामायणातील एका प्रसंगावर आधारलेला होता. त्याचे कथानक असे होते—

राम-रावण युद्धात रामाच्या बाजूने लक्ष्मण आणि रावणाच्या बाजूने इंद्रजित हे रणांगणावर लढण्यास सज्ज होतात. इंद्रजित हा सुलोचनेचा नवरा आणि सुलोचना ही शेषाची म्हणजेच लक्ष्मणाची मुलगी. त्यामुळे लक्ष्मण आपल्या मुलीच्या

नवऱ्याबरोबर लढण्यास तयार होत नाही. तेव्हा त्याला सांगितले जाते की समोरा समोर युद्धास ठाकलेल्या योध्दयांनी नात्यागोत्याचा विचार करावयाचा नसतो. हे ऐकून लक्ष्मण लढण्यास तयार होतो आणि आपल्या बाणाने इंद्रजिताचे शिर उडवितो.

पुढे ते धडापासून वेगळे झालेले शिर सुलोचनेच्या महालात येते. आपल्या नवऱ्याचा झालेला वध पाहून तिला अनिवार दुःख होते. ते शिर ताटात ठेऊन ती शोक करते आणि म्हणते की आज माझे वडील जवळ असते तर त्यांनी संजीवनी आणून माझ्या नवऱ्यास जिवंत केले असते. तोच ते शिर मोठ्याने हसायला लागते आणि सुलोचनेला म्हणते की, ' तुझ्या वडिलांनीच तर माझा वध केला आहे.' हे ऐकून तिला अधिकच दुःख होते.

अशा प्रकारचा हा वग होता. त्यात रंगमंचावरील ताटात ठेवलेले शिर बोलताना पाहून तमाशा पाहावयास आलेले प्रेक्षक चकित होत. ते जवळून पाहण्यासाठी काहीजण आपल्या जागेवरून उठून उभे राहात. त्यांनाही उद्देशून ते म्हणे, ' बसा बसा, खाली बसा, जागेवरून उठू नका ' तेव्हा लोकांना अधिक विस्मय वाटे. काही अतिउत्साही माणसे तर रंगमंचावरही गर्दी करीत व खात्री करून घेण्यासाठी, त्या शिराला ढोसून पहात. अशा माणसाला ते शिर चिडून म्हणे, 'ए, डोक्याला हात काय लावतोस ? जा, खाली जा आणि आपल्या जागेवर जाऊन बैस.' असा प्रकार सुरवातीला काही वेळा घडल्याचे सांगतात.

ते अशाप्रकारे घडे म्हणजे घडविले जात असे. लक्ष्मणाने बाण फेकल्यावर इंद्रजित झालेला माणूस प्रेक्षकांकडे पाय आणि पडद्याकडे डोके करून रंगमंचावर पडे. इतक्यात विंगमधून नकली शिर रंगमंचावर फेकण्यात येई. त्याला तार बांधलेली असे. त्या तारेच्या आधाराने ते शिर नंतर वर उचलून आस्ते आस्ते पलीकडच्या विंगमध्ये नेल्यावर, पुढचा पडदा पाडण्यात येई आणि इंद्रजित झालेला माणूस उठून व तळघरात जाऊन, कापून ठेवलेल्या फळीच्या फटीतून आपले डोके वर रंगमंचावर काढी. मग मध्यभागी गोलाकार कापलेले ताट त्याच्या मानेभोवती ठेवण्यात येऊन लाल कपड्याच्या व रंगाच्या साहाय्याने ते दृश्य अगदी बेमालूम करण्यात येई. जवळून पाहणारासही ते पटकन समजून येत नसे.

या वगामध्ये इंद्रजितचे काम पूर्वीचा नाचा सावळा हा करीत असे. या वगासाठी हसनशेठ बांगडीवाले यांनी बॉम्बे थिएटर, पलटणरोड आणि चिंचपोकळी येथील आपल्या तीन थिएटरांतून खास व्यवस्था करून ठेवली होती. हा वग चांगलाच लोकप्रिय झाला होता. तो ज्या ठिकाणी लावला जाई त्या ठिकाणी प्रेक्षक गर्दी करीत असत.

काही कालानंतर महत्त्वाचे कलावंत या फडातून फुटून गेल्यामुळे खेळ बंद पडले. ते ताबडतोब चालू करणे आनंदा चांडोलीकर यांस जमले नाही. म्हणून त्यांनी आपला तमाशाच बंद करून टाकला व आपण स्वतः शंकर औसरीकर यांच्या फडात गेले.

**शंकर ढाकमोलीकर**

( मु. ढाकमोली, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी. )

शंकर ढाकमोलीकर यांचा तमाशा मुंबईत लोकप्रिय होता. ते स्वतः सरदाराचे काम करीत. गाणेही चांगले म्हणत. त्यांच्या तमाशामध्ये तुकाराम खेडकर ( स्वतःचा फड उभा करण्यापूर्वी ) खांबकर, शिवराम, गणपत व बाळू ही गुणी मंडळी काम करीत होती.

बाळू हा चांगल्यापैकी गाणारा होता. तोही अधूनमधून सरदाराचे काम करीत असे. गणपत याने नंतर उरळीकर मास्तर यांच्या तमाशातून खलनायकाचे काम करून नाव कमविले. या तमाशामध्ये एक सुंदर नाचणारीण होती. पण ती अचानक फड सोडून गेल्यामुळे ढाकमोलीकर यांनी स्वतःच तो बंद करून टाकला व आपल्या सहकाऱ्यांना मोकळे केले.

**उरळीकर मास्तर**

उरळीकर मास्तर हे एक प्रख्यात तमाशा कलावंत होऊन गेले. पुण्यापासून जवळच असलेले उरळीकांचन हे त्यांचे गाव. ते एक सुशिक्षित, तसेच मारवाडी जैन समाजातील सुखवस्तू गृहस्थ होते. पण त्यांना पहिल्यापासूनच कलेची फार आवड असल्यामुळे ते अधूनमधून नाटकांतून कामे करीत. नाटकातील संभाजीची भूमिका त्यांची हातखंडा होती. त्या भूमिकेकरिता त्यांना खास बोलावून घेण्यात येई.

तमाशाकलेबद्दल त्यांना आवड निर्माण झाल्यावर त्यांनी आपला स्वतःचा फड उभा केला आणि पुण्यात व इतर आजूबाजूच्या खेड्यांतून त्याचे प्रयोग चालू केले. त्यांचा हा तमाशा हसनशेठ बांगडीवाले यांनी पुण्यात पाहिला व तो त्यांना आवडला. या तमाशाचे खेळ आपल्या मुंबईच्या थिएटरांतून व्हावेत असे त्यांना वाटू लागले व म्हणून त्यांनी हा फड खास आग्रह करून पुण्याहून मुंबईस आणला व त्याचा पहिला प्रयोग चिंचपोकळी येथील थिएटरमध्ये केला. ‘येणार येणार’ म्हणून अगोदरच जाहिरात झालेली असल्यामुळे त्या प्रयोगाला बरीच गर्दी झाली होती. प्रयोग चांगला झाला व उरळीकर मास्तरांचा तमाशा आणि त्यांतील त्यांचा वगही प्रेक्षकांना फार आवडला.

पुढे इतर फडांप्रमाणेच त्यांचे खेळ बांगडीवाले यांच्या निरनिराळ्या थिएटरातून आलटूनपालटून होऊ लागले आणि उरळीकर मास्तरांचे नाव आणि लोकप्रियता वाढत गेली. त्यांच्याकडे उत्कृष्ट कलावंतांचा संच होता. श्री. दत्ता महाडिक पुणेकर व प्रसिद्ध तमासगीर कै. माधव नगरकर यांनी या फडामध्ये कामे केलेली आहेत. उरळीकर मास्तर यांचे वग चांगले होत असत. ते अगदी नाटकी पद्धतीने बसविलेले असत. 'उमाजी नाईक' हा त्यांचा वग फार गाजला होता. त्यातील त्यांची उमाजीची आणि गणपत चव्हाण याची खलनायकाची भूमिका फार गाजली होती. उरळीकर मास्तर यांचा हा अत्यंत सोज्वळ असा तमाशा होता. त्यात जराही कोठे अश्लीलता नव्हती. या तमाशाचे प्रयोग नागपाडा पोलिसस्टेशन, रे रोड पोलिस कंपाऊंड व वरळी पोलिस कंपाऊंड या ठिकाणी झालेले आहेत. नागपाडा पोलिसस्टेशनच्या प्रयोगास 'पार्थप्रतिज्ञा' हा वग त्यांनी लावला होता. त्यांनी लावलेले वग असे होते– (१) उमाजी नाईक (२) भोसल्यांचा इन्साफ (३) पार्थप्रतिज्ञा (४) संतानी लालसा (५) गोरखनाथ (६) गवळ्याची रंभा (७) तानाजी मालुसरे (८) संत तुकाराम (९) समशेर बहाद्दर अर्थात विषारी डाकू व (१०) धर्मवीर संभाजी.

उरळीकर मास्तर हे अत्यंत प्रेमळ आणि विनयशील असे थोर कलावंत होते. आपल्या कार्यक्रमांतून प्रेक्षकांशी हितगुज करताना ते त्यांना (प्रेक्षकांना) 'मायबापहो' असे नेहमी संबोधीत व कोपरापर्यंत हात जोडून नमस्कार करीत.

**दामाजी कोरेगांवकर**

( कोरेगांव, ता. तळेगांव, जि. पुणे. )

दामाजी कोरेगांवकर हे एक चांगल्यापैकी तमाशा कलावंत आणि फड-मालक होऊन गेले. ते कवीही होते. त्यांनी आपला तमाशा हसनशेठ बांगडीवाले यांच्या ठेकेदारीत चालविला होता. या तमाशात सगुणा नावाची एक देखणी व नृत्यामध्ये निपुण असलेली नाचणारीण होती. ती राणीचे काम चांगले करीत असे. तसेच जाखुजी रोहोम नावाचे एक जुन्यापैकी कलावंत सोंगाड्याचे व स्वतः दामाजी कोरेगांवकर सरदाराचे काम करीत असत. स्वतःच लिहिलेल्या लावण्या आणि वग कोरेगांवकर यांनी आपल्या तमाशातून वापरले. त्यांचा जम चांगल्याप्रकारे बसला होता.

परंतु काही काळानंतर कोरेगांवकरांची परिस्थिती एकदम खालावली व त्यांचा तमाशा बंद पडला तो पुन्हा चालू झालाच नाही. नंतर तेही आजारी पडले व १९६६ मध्ये पुणे मुक्कामी निधन पावले.

**दादू इंदुरीकर**

पुणे जिल्ह्यातील इंदुरी, हा दादू इंदुरीकरांचा गाव. दादू इंदूरीकर यांचे वडील राघू इंदुरीकर, हेही अगोदरच्या काळात प्रसिद्ध तमासगीर म्हणून होऊन गेले. राघू इंदुरीकरांचा काळ भेदिक तमाशाचा होता.

वडिलांच्या निधनानंतर दादोबांनी गावकऱ्यांच्या आग्रहाखातर आपला चुलत-भाऊ मारुती याच्या सहकार्याने 'दादू मारुती इंदुरीकर' या नावाने फड उभा केला, पण तो चालला नाही. त्यांना अपयश आले. त्याचवेळी मारुतीही अकस्मात मरण पावला व सर्व जबाबदारी दादोबांच्याच अंगावर येऊन पडली. फड बंद झाला त्यामुळे डोक्यावर कर्जाचा डोंगर घेऊन, पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांना लहानसहान नोकऱ्या कराव्या लागल्या; परिस्थितीशी नेहमी झगडत राहावे लागले. अशी जवळजवळ वीस वर्षे गेली.

पण पुढे मात्र दादू इंदुरीकर यांचे भाग्य उजळले. नाटचसृष्टीतील एक हुशार व कल्पक कलावंत कै. शंकर घाणेकर यांच्याशी त्यांची भेट झाली. कै. शंकर घाणेकर आणि हनुमान थिएटरचे मालक श्री. मधुकरराव नेराळे यांच्या मार्गदर्शनाखाली, जुने तमासगीर कै. हरिबा वडगांवकर यांचा गाजलेला 'सावळ्या कुंभार' हा वग 'गाढवाचे लग्न' या नवीन नावाने बसविण्यात येऊन जसराज थिएटर्सच्या नावाखाली रसिकांपुढे सादर करण्यात आला. तो अतिशय लोकप्रिय ठरला आणि दादू इंदुरीकर हे एकदम प्रकाशाच्या झोतात आले. तमाम रसिक दादोबांच्या कामावर बेहद्द खूष झाले. दादोबांनी आपल्या शुद्ध व स्पष्ट वाणी, हजरजबाबीपणा, व सहजसुंदर अभिनयाने पांढरपेशा सुशिक्षित वर्गालाही आपल्याकडे आकर्षित करून घेतले. त्यांना पोटदुखेपर्यंत हसायला लावले आणि प्रत्येक वेळी त्यांचेकडून कडकडून टाळी घेतली. यात त्यांना प्रभा शिवणेकर यांची चांगली साथ मिळाली होती. तसेच शंकर शिवणेकर, ढोणेमास्तर, वसंत औसरीकर वगैरे कलावंतांनीही आपले अभिनयकौशल्य दाखवून हा वग यशस्वी करण्यास मदत केली होती.

अशाप्रकारे दादू इंदुरीकर यांनी रसिकांचे अलोट प्रेम संपादन केले. एक साधा सोंगाड्या, तमाशाकलेचा सम्राट बनला.

गुणी कलावंताला जर योग्य संधी मिळाली तर तो आपल्या अंगच्या कला-गुणांनी केवढा मोठा होऊ शकतो, याचे दादू इंदुरीकर हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

भाऊ बापू नारायणगावकर यांच्यानंतर, तमाशाकलेसाठी राष्ट्रपतिपदक मिळविण्याचा मान दादू इंदूरीकर यांनाच मिळाला. तसेच ते पद्मश्री हा किताब मिळविणारे तमाशाक्षेत्रातील पहिले तमासगीर आहेत.

अशा या थोर कलावंताने, खंडाळा या ठिकाणी तारीख १३ जून १९८० रोजी कोणालाही चाहूल लागू न देता आकस्मिकरीत्या या जगाचा कायमचा निरोप घेतला.

**तुकाराम खेडकर**

(मु. चिंचघर, ता. खेड, जि. रत्नागिरी)

तुकाराम खेडकर यांनी लहानपणीच तमाशामध्ये प्रवेश केलेला होता. सुरवातीला त्यांनी शंकर ढाकमोलीकर यांच्या तमाशात नाच्याचे काम केले. नंतर उपजीविकेचा प्रश्न सोडविण्यासाठी मुंबईस येऊन त्यांनी गिरणीमध्ये नोकरी धरली. परंतु त्यांच्या मनात मुळात निर्माण झालेली तमाशाकलेची आवड नष्ट झालेली नव्हती. नंतर त्यांना एक लक्ष्मण भेटला आणि या दोघांची राम-लक्ष्मणासारखी जोडी जमली. कलेच्या समान आवडीमुळे ते एकदम एकमेकांचे जिव्हाळ्याचे मित्र बनले. तुकाराम खेडकर यांस भेटलेल्या या लक्ष्मणाचे नाव श्री. पांडुरंग मुळे मांजरवाडीकर आणि त्यांचे गाव मांजरवाडी, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे, असे आहे. या दोघांनी एकमेकांच्या सहकार्याने एक आदर्श असा तमाशा चालू केला. वग नाटकी पद्धतीने बसविले, आणि ते लोकप्रिय केले. त्यांच्या वगांसाठीच खास येणारे काही प्रेक्षक होते.

तुकाराम खेडकर हे तमाशाक्षेत्रातील एक जिद्दी आणि जबरदस्त व्यक्तिमत्त्व होते. ते चांगल्यापैकी कलावंत होते. स्वत: सरदाराचे काम करीत आणि तमाशातून पोवाडे म्हणून प्रेक्षकांना भारून टाकीत. तसेच ते भारदस्त कार्यक्रम सादर करून प्रेक्षकांना पुरेपूर समाधान मिळवून देत. अशा प्रकारे त्यांनी लोकांचे प्रेम आणि आदरभाव संपादन केला होता. त्यांचा "रायगडची राणी" हा वग सर्वत्र गाजला. तुकाराम खेडकर यांनीच तो लिहिला होता. या वगाने त्यांना नाव मिळवून दिले आणि त्यांची आर्थिक बाजूही चांगली सावरली.

त्यानंतर नवीन रक्ताचे काही तरुण त्यांना येऊन मिळाले आणि तो सच अधिकच आकर्षक बनला. त्यांचे प्रयोग देखणे होऊ लागले. पण १९६४ मध्ये तुकाराम खेडकर अकालीच गेले. नंतर फडाचे नेतृत्व श्री. पांडुरंग मुळे मांजरवाडीकर यांच्याकडे आले. आपल्या जिवलग मित्राची स्मृती कायम राहावी म्हणून श्री. मुळे यांनी त्या फडाच्या नावामध्ये काहीएक बदल न करता जुन्याच नावावर (कै. तुकाराम खेडकर, सह पांडुरंग मुळे, मांजरवाडीकर या नावावर) तो आता चालविला आहे. सध्या लोकप्रिय असलेला श्री. चंद्रकांत ढवळपुरीकर, गुलाबराव बोरगावकर, शंकरराव कोकाटे, साहेबराव नांदवळकर, कान्ताबाई सातारकर आदि मंडळी सुरवातीला याच तमाशातून पुढे आलेली होती.

तसेच कै. तुकाराम खडकर यांचे कलावंत पुत्र रघुवीर खेडकर व श्रीमती कांताबाई सातारकर यांनीही कै. तुकाराम खेडकर यांचे स्मृतिप्रीत्यर्थ स्वतंत्र तमाशा फड उभा करून तो अत्यंत उमेदीने चालविला आहे.

**दत्तोबा तांबे शिरोलीकर**

(मु. शिरोली, ता. जुन्नर, जि. पुणे)

दत्तोबा तांबे शिरोलीकर हे तमाशाक्षेत्रामध्ये आणि प्रत्यक्षातही समर्थ, वडिलांचे समर्थ वारसदार होऊन गेलेले आहेत.

दत्तोबांनी आपले वडील दगडू साळी शिरोलीकर यांच्याप्रमाणेच एक फार मोठा तमाशा फड यशस्वीरीत्या चालविला आणि त्यातील सोंगाड्याची भूमिकाही आपल्या वडिलांप्रमाणेच आपल्या हयातीत पार पाडली.

जीवनात विनोद ही माणसाची एक गरज आहे. या विनोदाच्या माध्यमातूनच दत्तोबा तांबे यांनी दीर्घकाळ कर्तव्यबुद्धीने जनताजनार्दनाची सेवा केली. त्यांच्या या कामी त्यांच्या फडातीलच एक कलावती चंद्राबाई यांची त्यांना चांगल्या प्रकारे साथ मिळाली होती.

दत्तोबा तांबे हे लहानपणापासून तमाशाच्या व्यवसायातून आपले जीवन जगत आले होते. त्यामुळे तमासगिरांच्या व्यथा, त्यांची दुःखे आणि चुकाही ते जाणून होते. तमाशाकलेचा इतिहास त्यांना चांगलाच विदित असल्यामुळे ते तमाशा परिषदेचे अध्यक्षही होऊ शकले.

तमाशाकलेवर त्यांची अपार श्रद्धा होती. या कलेची प्रगती व्हावी व तिच्या कलावंतांना समाजात सन्मानाने जगता यावे ही त्यांची खंत होती. परंतु दुर्दैवाने तारीख १८-६-१९८१ रोजी पुणे मुक्कामी वयाच्या एकसष्टाव्या वर्षी त्यांचे निधन झाले.

**बाबूराव कुपवडेकर**

(मु. कुपवडे, जि. सातारा)

इ. स. १९३० नंतरचा काळ हा तमाशाकलेच्या मंदीचा काळ होता. परंतु हसनशेठ बांगडीवाले यासारख्यांच्या आश्रयामुळे, नव्या जडणघडणीतून तमाशाकलेला जीवदान मिळाले. त्यामुळे तो काळ तमाशाकलेच्या परिवर्तनाचाच ठरला. या परिवर्तनात बहुतेक जुने कलावंत मागे पडले. काही वृद्धत्वामुळे निवृत्त झाले आणि नव्या पिढीतील ताज्या दमाचे तरुण कलावंत पुढे आले. त्यांनी आपल्या विविध कलागुणांच्या जोरावर प्रेक्षकांस रिझविले आणि त्यांना तमाशाकडे खेचून आणले.

या नव्या कलावंतांनी वगांवर विशेष भर देऊन व ते आकर्षक पद्धतीने सादर करून लोकप्रिय केले. हसनशेठ बांगडीवाले यांनी आपल्या सर्व थिएटरांतून वगांना लागणाऱ्या नेपथ्याची, कपड्यांची आणि इतर सजावटीची उत्तम सोय उपलब्ध करून दिली होती. कसलीही कमतरता पडू दिली नाही. त्यामुळे वग फार लोकप्रिय झाले. " रायगडाला जेव्हा जाग आली " या वगात रायगड क़िल्ल्याची पुठ्ठ्याची हुबेहूब प्रतिमा रंगमंचावर उभी केली.

बाबूराव कुपवडेकर हे याच नव्या पिढीचे प्रतिनिधी होते. ते आनंदा चांडोलीकर, बाबूराव कवठेकर वगैरेंसारखेच लोकप्रिय ठरले होते. त्यांनी भाऊ फक्कड यांचे गण, गौळण, लावणी, वग वगैरे संपूर्ण साहित्य आपल्या तमाशातून वापरले. भाऊ फक्कड यांच्या व्यंकटराव मास्तर या वगातील फौजदाराची भूमिका ते फार छान करीत, असे सांगतात. भाऊ फक्कड यांनी आपल्या अखेरच्या काळात याच फडाबरोबर राहून आपले उर्वरीत आयुष्य घालविले.

**शिवा मेढेकर**

(मु. मेढे, ता. जावळी, जि. सातारा)

श्री. शिवा मेढेकर हे तमाशा व्यवसायातून निवृत्त झालेले एक जुने तमासगीर असून ते शासकीय निवृत्ति-मानधनाचे मानकरी होते.

त्यांचा जन्म १९०६ मधला. तारुण्यात पदार्पण केल्यावर, कलेच्या आवडीमुळे ते तमाशा व्यवसायाकडे वळले व त्यांनी जवळजवळ चाळीस वर्षे आपला तमाशाचा फड चालविला. तमाशाचा फड चालविणे ही एक कठीण कसरत आहे. वर्षातून चार महिने बंद व आठ महिने चालणारा हा धंदा आहे. आठ महिन्यांत बारा महिन्यांचा कारभार चालवावयाचा असतो. हा धंदा चालविणाऱ्याजवळ कल्पकता, दूरदृष्टी आणि व्यवहारज्ञान असावे लागते. नाहीतर त्याला अनेक संकटांना तोंड द्यावे लागते व काही वेळा आपला धंदा बंद करण्यापर्यंतही पाळी येते. परंतु श्री. मेढेकरांनी आपला तमाशा दीर्घकाळ यशस्वीरीत्या चालविला.

महाराष्ट्रातील मोठमोठ्या शहरांतून आणि मुंबईतही त्यांचा तमाशा चांगलाच लोकप्रिय झालेला होता. त्याचप्रमाणे जत्रा, उरूस, सणावारांचे व बाजारांचे दिवस, या निमित्ताने खेड्यापाड्यांतूनही त्यांनी कार्यक्रम केले व जिल्ह्याजिल्ह्यांतून दौरेही काढले होते. कोकणातील महाड, खेड, दापोली व चिपळूण या गावांतून त्यांचे खेळ झालेले आहेत. आपण स्वतः रचलेली व भाऊ फक्कड यांची गाणी त्यांनी आपल्या तमाशातून गायिली.

इ. स. १९६७ मध्ये श्री. मेढेकर हे दौऱ्यावर असता आगगाडीतून उतरताना त्यांच्या पायास इजा झाली. रुग्णालयात राहूनही तो पाय संपूर्ण बरा होऊ शकला

नाही. त्यामुळे पुढे तमाशात काम करणे त्यांना अशक्य झाले. म्हणून त्यांनी तमाशा विसर्जित केला व आपणही निवृत्त झाले.

**चंद्रकांत ढवळपुरीकर**

(ढवळपुरी, जि. अहमदनगर)

चंद्रकांत ढवळपुरीकर हे अलीकडच्याच काळातील एक प्रसिद्ध तमासगीर आहेत. परंतु तमाशाक्षेत्रातील त्यांची उमेदवारी मात्र जुनी आहे.

प्रथम त्यांनी १९४३–४४ मध्ये ' विष्णू वांगर-वेल्हेकर सह देवीदास रांधेकर यांच्या तमाशात काम केले. त्यानंतर १९५५ ते १९६२ पर्यंत तुकाराम खेडकर व १९६३–६४ मध्ये जगताप पाटील पिंपळेकर यांच्या फडात ते होते त्यानंतर मात्र त्यांनी १९६४ च्या गुढी पाडव्याचे दिवशी आपला स्वतंत्र फड उभा केला. या फडाचे वैशिष्टय असे आहे की दत्ता महाडिक पुणेकर यांच्यासारख्या एका हुशार अनुभवी व नामवंत सोंगाड्याचे सहकार्य त्यांना त्यात लाभले आहे व त्यामुळे एका चांगल्या तमाशा फडाची भर तमाशाक्षेत्रामध्ये पडली आहे. रसिक जनांच्या प्रत्यक्ष समोरच हा तमाशा आता गाजत आहे.

**पवळाबाई हिवरगांवकर**

(हिवरगांव, ता. संगमनेर, जि. अहमदनगर)

पवळाबाई हिवरगांवकर हिने तमाशा रंगमंचावर एक स्त्री-कलावंत म्हणून सर्वप्रथम प्रवेश करून आपल्या गायनाने, अभिनयाने आणि नृत्यकौशल्याने दीर्घ-काळ संपूर्ण महाराष्ट्र गाजविला आणि तमाशाकलेच्या इतिहासामध्ये आपले नाव अमर करून ठेवले आहे.

मुळात पवळाबाई ही मुरळी म्हणून खंडोबाच्या नावाने सोडलेली एक मुलगी होती. ती लहान असतानाच नृत्यात आणि गाण्यात तरबेज झाली. प्रथम तिने नामा धुळवडकर यांच्या फडात काम केले व नंतर तो फड बंद पडल्यावर पठ्ठे बापुराव यांच्या तमाशात सामील झाली.

पवळाबाई ही आकर्षक बांध्याची तरुण नाचणारीण व पठ्ठे बापुराव हे एक प्रथितयश कवी. या दोन गुणी कलावंतांची युती झाल्यावर पठ्ठे बापुराव यांच्या तमाशाला नवा बहर आला. पठ्ठे बापुराव यांनी भराभर कवने लिहिली आणि पवळाबाईने आपल्या पदलालित्याने आणि आकर्षक हावभावाने ती खुलवून तमाशारसिकांस अगदी घायाळ करून टाकले. त्यांचा तमाशा मुंबई, पुणे, कोल्हापूर आदी मोठमोठ्या शहरातून फारच लोकप्रिय झाला. कार्यक्रमांना अफाट गर्दी होऊ लागली आणि अशा प्रकारे पठ्ठे बापुराव आणि पवळाबाई ही प्रसिद्धीच्या

शिखराला जाऊन पोचली. परंतु त्यानंतर काही कारणामुळे त्या दोघांमध्ये मतभेद निर्माण झाले आणि ती एकमेकांपासून दूर झाली ती कायमचीच. पुढे दोघांनीही स्वतंत्रपणे आपले फड उभारून या क्षेत्रातील आपले अस्तित्व टिकविण्याचा प्रयत्न करून पाहिला, पण त्यांचा जम बसला नाही म्हणून पुढील संपूर्ण हयात त्यांनी स्वस्थ बसूनच घालविली.

पवळाबाई ही वृद्धत्वामुळे १९३९ मध्ये मुंबई मुक्कामी मरण पावली.

**कवी पिराजीबुवा करंजेकर**

(लवंगर–करंजे, ता. वाई, जि. सातारा.)

वेळोवेळी बहुजनसमाजामध्ये जसे कलावंत निर्माण झाले तसेच कवीही निर्माण झालेले आहेत. तमाशाला किंवा इतर कुठल्याही कलाप्रकाराला नेहमी काव्याची गरज असतेच आणि ही गरज हे कवी पुरी करीत आलेले आहेत.

याच कविपरंपरेतून पिराजीबुवा करंजेकर हेही आलेले आहेत. त्यांनी शास्त्रावर आणि अध्यात्मावर आधारलेल्या लावण्या व इतर कवने खूप लिहिली व त्यांतून ज्ञान, तत्त्वज्ञान आणि सन्मार्ग दाखविण्याचा प्रयत्न केला.

पिराजीबुवा हे तुरा पक्षाचे अनुयायी होते. ते निरक्षरच होते. त्यांनी आपली कवने शिष्याकडून तोंडपाठ करून घेऊन आपली परंपरा पुढे चालविली. ते शीघ्र-कवी होते. बसल्या जागीच ते भराभर कवने तयार करीत व काही वेळा इतरांकडून कागदावर उतरवून घेत असत. त्यांचा शिष्यपरिवार फार मोठा होता. त्यामध्ये दाजी पेंढारकर, पांडू आजवीलकर, सखाराम भांबेडकर, पांडू हर्दखळेकर, तुकाराम भांबेडकर वगैरे प्रमुख होते. दाजी पेंढारकर हे पट्टशिष्य होते. त्यांना पिराजी-बुवांच्या पुष्कळ लावण्या मुखोद्गत होत्या आणि त्या ते चांगल्या तऱ्हेने सादर करीत. कलगी तुऱ्याच्या अटीतटीच्या सामन्यातून पिराजीबुवा हे दाजी पेंढारकर यांसच आपल्याबरोबर घेत असत.

पिराजीबुवा यांच्या उपलब्ध झालेल्या काही लावण्या इतरत्र दिल्या आहेत. त्यामध्ये पिराजीबुवांनी आपले गुरु भिवबा यांचा उल्लेख अत्यंत भक्तिभावपूर्वक केलेला आढळतो.

पिराजीबुवा इ. स. १९३८ मध्ये आपल्या घरीच निधन पावले. त्यांच्या शिष्यमंडळीने त्यांचे स्मारक त्या ठिकाणी उभे केले आहे.

**झिल्या जैतापकर**

(जैतापूर, ता. राजापूर, जि. रत्नागिरी.)

झिल्या जैतापकर यांचे संपूर्ण नाव कृष्णाजी धर्माजी जैतापकर असे होते. त्यांनी सुरवातीला पूर्णपणे भेदिक तमाशा चालविला. ते शक्तिसंप्रदायाचे अनु-

याथी होते. बाबाजी कर्जाळा हे त्यांचे गुरू आणि धाकू पाटणकर हे एक गुरुबंधू. भेदिक लावण्या आणि कूटप्रश्नांचे सवाल-जबाब यांमध्ये त्यांनी खूप रस घेतला होता. नंतर रंगतीचा तमाशाही चालविला. झिल्या जैतापकर हे स्वतः गाणे म्हणत व ढोलकी वाजवीत आणि त्यांचे बंधू बाबाजी हे डफ वाजवीत. देऊ सोलगावकर हा त्यांचा नाच्या होता, परंतु त्याच्या अकाली निधनानंतर अर्जुन महादू जैतापकर यांनी पुढे नाच्याचे काम केले.

झिल्या जैतापकर यानी कोकणांमध्ये, त्यावेळी, एक मोठा दौरा काढून अनेक खेड्यापाड्यांतून आपल्या तमाशाचे कार्यक्रम केले आणि खूप प्रसिद्धी मिळविली. ते १९१७ मध्ये निधन पावले. त्यांचे पश्चात त्यांचे पुत्र यशवंत कृष्णाजी जैतापकर यांनी आपल्या वडिलांची परंपरा काही दिवस पुढे चालविली. पण त्यात त्यांचे मन रमले नाही. म्हणून त्यांनी तमाशाची परंपरा सोडून "शनैश्वर प्रासादिक भजनी मंडळी" या नावाचे भजनी मंडळ काढले व चालविले. कारनॅक पुलाजवळील मांडवी-कोळीवाड्यातील त्यावेळचे प्रसिद्ध भजनकार सावळारामबुवा व भजनसम्राट फुलाजीबुवा यांचेशी त्यांची फार जिव्हाळ्याची मैत्री होती. त्याहीनंतर यशवंतराव यांनी हौशी कलावंत म्हणून नाटक कंपनी स्थापन करून १९२६ मध्ये वीरसेन-मंजिरी व सत्यवान-सावित्री ही दोन नाटके, त्यावेळच्या व्हिक्टोरिया थिएटर-ताज सिनेमा) मध्ये लावली. या दोन्ही नाटकांतून अनाजी पडेलकर यांनी स्त्री-भूमिका केली होती. अनाजी पडेलकर हे चांगल्यापैकी गाणारे होते. पुढे यशवंतरावांनी नेहमी धार्मिक कार्यात आणि सामाजिक चळवळीतही अग्रेसर राहून आपल्या हयातीत समाजसेवेच्या कार्याला हातभार लावला आहे. ते १९५० मध्ये दिवंगत झाले.

**चिमाजी शेर्पेकर**

(शेर्पे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग)

तमाशाच्या भेदिक प्रकारातील एक श्रेष्ठ जाणकार आणि भेदिक लावण्यांचे कवी चिमाजी देऊ शेर्पेकर यांचा जन्म एका गरीब कुटुंबात झाला. त्यांचे बालपण गावीच गेले. तारुण्यात पदार्पण केल्यावर उपजीविकेचा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी मुंबई गाठली आणि मुंबई महानगरपालिकेत साध्या मजुरीचे काम मिळविले. पुढे भेदिक तमाशाची आवड निर्माण झाल्यावर, त्यांनी लिहिता-वाचता येईल इतपत शिकून, शास्त्रे, पुराणे, रामायण, महाभारत, काशीखंड, नवनीत, रामविजय, हरिविजय, ब्रह्मपुराण वगैरे धार्मिक ग्रंथ स्वतः विकत घेऊन व त्यांचे जिज्ञासू वृत्तीने वाचन आणि मनन करून त्यात पारंगतता मिळविली आणि त्यावर भेदिक कवने रचली. तसेच त्या अनुषंगाने अनेकवेळा इतरांशी चर्चा व

वादविवाद करून आपला ठसा त्यांच्या मनावर उमटविला. तसेच त्यांनी स्वतः भेदिक तमाशाच्या सामन्यातून कूटप्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन अनेक बक्षिसे मिळविली होती.

अशाप्रकारे चिमाजी शेर्पेकर यांनी चाळीस वर्षे हा व्यासंग केला. पुढे नोकरीतील निवृत्तीमुळे व भेदिक तमाशाचा काळही ओसरलेला असल्यामुळे ते आपल्या गावी जाऊन स्थायिक झाले.

**बाबूराव कुणकवणकर**

(कुणकवण, ता. देवगड. जि. सिंधुदुर्ग)

बाबूराव कुणकवणकर हे तमाशाक्षेत्रामध्ये एक उत्कृष्ट ढोलकीवादक म्हणून होऊन गेलेले आहेत. साधारणपणे पन्नास-पंचावन वर्षांपूर्वीच्या, बहुतेक सर्व नामांकित तमासगिरांच्या तमाशातून त्यांनी ढोलकी वाजवून प्रसिद्धी मिळविली होती. त्यांच्या ढोलकीच्या तालावर प्रसिद्ध तमाशा नृत्यांगना पवळाबाई हिने नृत्य केलेले आहे. बाबूराव कुणकवणकर हे जरी ढोलकी वाजविण्याकरिताच प्रसिद्ध असले, तरी ते हलगीही तितक्याच उत्तम प्रकारे वाजवीत असत. तसेच ते एक अष्टपैलू कलावंतही होते. तमाशातील कोणत्याही पात्राचे काम ते अगदी सहजगत्या पार पाडीत.

काही काळानंतर त्यांनी स्वतःचाच तमाशाफड उभा केला होता. त्यात ते हलगी वाजवीत व त्यांचा मुलगा धोंडू हा ढोलकी वाजवीत असे. सुरवातीला साधू माघाडे (औरंगाबाद) याने नाच्याचे काम केले व नंतर सखू ही नाचणारीण या तमाशात आली. तिचा नवरा लहानू फक्कड हा सोंगाड्याचे काम करी. सखाराम कुणकवणकर यांनी गाण्याची बाजू सांभाळली होती. काशीराम बोरबेटकर व सीताराम सोनाळकर हे वगांमधून महत्त्वाची कामे करीत.

बाबूराव यांनी थिएटरातून व मुंबईतील निरनिराळ्या वस्त्यांतून सुपारीवर अनेक कार्यक्रम केले. पुढे वृद्धत्वामुळे १९५४ नंतर त्यांनी आपला तमाशा बंद केला आणि गावी जाऊन स्थायिक झाले.

□ □

३२९८ २५/८/८० नोंद २७/११/१९८८

REFBK-0025780

साहित्य सेवा
पारगावकर निवास, औरंगपुरा,
औरंगाबाद, ४३१००१.